

सविता नाबर

# छोट्यांची मोठी गोष्ट

# छोट्यांची मोठी गोष्ट

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकेला फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# छोट्यांची मोठी गोष्ट

कथा

सविता नाबर

ई साहित्य प्रतिष्ठान

छोट्यांची मोठी गोष्ट


लेखिका : सविता नाबर

savitanabar@gmail.com

8149658022

302, NABAR SANKUL,

5th Cross Main Road,

Rajarampuri, Kolhapur 416008

ब्लॉग : https://savitanabar.blogspot.in/



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.



प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : 23 February 2018



©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.



## अर्पणपत्रिका

माझ्या लेखनाचे सतत स्फूर्तीस्थान असलेले

माझे वडील श्री श्रीकृष्ण आत्माराम बेकनाळकर

यांना सादर अर्पण

# मनोगत :



माझे पहिले ई बुक प्रसिद्ध झाले आणि त्याला वाचकांचा फारच सुंदर प्रतिसाद लाभला. आणखी काही कथांचे दुसरे ई बुक काढायचे ठरले. माझ्या या दुसऱ्या ई बुकची तयारी चालू असतानाच माझ्या लेखनाचे सतत स्फूर्तीस्थान असलेले माझे वडील श्री श्रीकृष्ण आत्माराम बेकनाळकर यांचे आकस्मिक दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने मनावर झालेला आघात पुसला जात नव्हता. पण एका क्षणी ठरवले कि माझे लिखाण हीच त्याना खरी आदरांजली होईल. आणि मी पुढच्या कामाला लागले.

या पुस्तकातल्या कथा खरेतर म्हटले तर सामान्यांच्या आहेत. दैनंदिन जीवनात आपल्याला भेटलेल्या व्यक्ती अशा असू शकतात. पण त्यांचे जीवन कधी कधी विशाल सागराच्या तळासारखं गूढ, अगम्य असू शकते. वरवर पाहता कथा सामान्यांच्या आहेत . पण यातल्या प्रत्येक कथेतला नायक किंवा नायिका हि त्याच्या किंवा तिच्या जीवनात घडलेल्या एखाद्या प्रसंगाने, घटनेने ढवळून निघाला आहे. एखाद्याच घटनेने त्यांच्या आयुष्यावर चिरस्मरणीय ठसा उमटवला आहे. एखादी सर्वसामान्य व्यक्ती पण तिच्या आयुष्यात कशी उलथापालथ होऊ शकते, कधी चांगली तर कधी वाईट. म्हणून कथेचे नाव “छोट्यांची मोठी गोष्ट” असे दिले


आहे. पहिल्या कथा संग्रहाप्रमाणेच याही कथा वाचकांच्या पसंतीस उतरतील अशी आशा आहे. हीच माझ्या वडिलाना भावपूर्ण श्रद्धांजली !!


माझ्या इ बुक चे डिझाईन, ले आऊट आणि अर्थातच प्रसिद्धी याची जबाबदारी इ साहित्य प्रतिष्ठानने आपल्या शिरावर घेतली. यासाठी इ साहित्य प्रतिष्ठानच्या टीमची मी अत्यंत आभारी आहे. त्यांच्याशिवाय हे ईबुक वाचकांना मिळू शकले नसते. कृपया आपल्या प्रतिक्रिया मला आवर्जून कळवा.

**सविता नाबर**

savitanabar@gmail.com

8149658022



या कथासंग्रहातील सर्व कथा काल्पनिक आहेत.

यातील सर्व पात्रे, नांवे, प्रसंग आणि स्थळे काल्पनिक असून

त्यांचे कोणत्याही जीवित अथवा मृत व्यक्तीशी साम्य आढळून आल्यास

तो निव्वळ योगायोग समजावा.

कथानुक्रम :

प्राक्तन
पश्चात्ताप
मकसद
इतिहास
सुबह का भूला.........
गुरुदक्षिणा
प्रत्यक्षाहुन प्रतिमा उत्कट !!
..........तर माझं काय चुकलं
ओळख
मैत्रिणीची गोष्ट
वारसदार
लागेबांधे
हे बंध रेशमाचे
परतफेड
पिंजरा
स्वप्न
रॉंग नंबर
वळण
पतंग
जवळचे........ दूरचे

# प्राक्तन

बऱ्याच वर्षांनी ती मला आज भेटली. कॉलेज संपल्यानंतर वीस वर्षांनी. कॉलेज मधे असताना कशी रसरशीत दिसायची. अर्थातच वयाचा महिमा होताच. विशीतली ती आणि चाळीशीतली ती यात फरक असणारच. तिचं गाणं आजही सुरू होतं. एकूण संसार छान चालला असावा असा आपला माझा अंदाज. बराचवेळ गप्पा झाल्या. तिचा नवरा बांधकाम व्यावसायिक होता. त्याचे कितीतरी प्रोजेक्ट्स नावाजण्यासारखे होते. नावलौकिक, पैसा, सुख कशालाच कमतरता नव्हती.

हे सगळं सांगता सांगता तिचा गळा भरून आला. तिचा नवरा काही महिन्यांपूर्वी कामाचा ताण असह्य होऊन हृदयविकाराने गेला. आयुष्य भरभरून जगताना डाव अर्ध्यावरच मोडला होता. इलाज नव्हता. तिच्या सोळा वर्षाच्या मुलाला घेऊन ती एकटी महालासारख्या बंगल्यात रहात होती. बोलता बोलता कॉलेजच्या दिवसांवर विषय आला. किती फुलपंखी दिवस होते ते! आमच्या वर्गातला स्कॉलर असलेल्या त्याचा विषय निघणं अपरिहार्यच होतं. आणि तिचा तर कधी काळी तो म्हणजे जिव्हाळयाचा विषय होता. कालच मला त्याच्या विषयी कळलं होतं.

तो दिसायला नाकी डोळी देखणा होताच, उंच, मजबूत बांध्याचा. सावळासा. चेहऱ्यावर करारी भाव. थोडासा अंतर्मुख. स्वत:मधेच रमणारा. अतिशय हुशार. टेबल टेनिस छान खेळायचा. खेळाडू असला तरी त्याला मित्र फारसे नव्हते. आणि तो खिलाडू वृत्तीचा असला तरी वागताना थोडसं हातचं राखून

वागल्यासारखा वागायचा. तिला तो जाम आवडायचा. आमचा क्लासमेट धीरेन. कधी तिला त्याच्याशी बोलायचा योग आला नव्हता. मैत्रिणी त्याच्यावरून तिला खूप चिडवायच्या. तिला खूप वाटायचं कि त्यानं आपल्याशी बोलावं. ती कॉलेजची गानकोकिळा होती. तिला वाटायचं त्यानं आपल्या गाण्याचं कौतुक करावं, काहीही करून बोलावं. कदाचित....... त्यालाही तिच्याबद्दल काही वाटत असेल का? नक्कीच. कारण एक दोनदा त्यानं तिच्याकडे बघून हसल्यासारखं केलं होतं. पण कळत नकळतच. कि तिच्या मनाचा तो खेळ होता? पण जाणून बुजून त्याच्या कधी पुढे पुढे करावं असं तिला वाटल नाही. तिच्या मनातली सुप्त इच्छा मात्र होती कि त्यानं आपल्याशी बोलावं अशी. प्रकर्षानं वाटायचं त्यानं आपणहून विचारावं लग्नाबद्दल. जेव्हा तिचं लग्न ठरलं तेव्हा तिची आशा पार मिटून गेली. अबोल प्रीत मुग्धच राहून गेली.

तिचं लग्न झालं एका होतकरू तरुणाशी. महत्वाकांक्षी आणि जगण्याची आसोशी असलेला, तिच्या कलेची, गुणांची कदर असलेला. सुरुवातीला खाजगी नोकरीत अगदी लहानशा पोस्टवर असलेला तिचा नवरा, स्वत;च्या धडाडीवर खूप वरपर्यंत चढत गेला. नोकरी सोडली आणि छोट्या छोट्या बांधकामांची कामं घेऊन फार लवकर प्रगती केली. मग मोठ्या कॉम्प्लेक्सचे प्रोजेक्ट्स घ्यायला लागला. व्यवसायाची नस त्याला बरोबर सापडली होती. तिला चारीकडून सुख होतं. पण नियती म्हणजे काय असतं हे तिला काही महिन्यांपूर्वी कळलं. तिचा नवरा संसाराचा डाव अर्ध्यावर टाकून गेला होता.

माझ्या मनात विचार आला, तिचं लग्न धीरेनशी झालं असतं तर! बोलताना विषय आला होता धीरेनचा. माझ्या घशाशी आवंढा आला. कुठल्या तोंडानं मी तिला सांगणार होते कि तोही या जगात नाही? तो एक आय ए एस ऑफिसर होता. आमच्या एका मैत्रिणी कडूनच त्याच्या अपघाताची बातमी कळली होती. तिच्या संसाराची गाठ कुणाशीही बांधली गेली असती तरी विधिलिखित अटळ होतं. चाळीशीतच तिला सौभाग्यापासून फारकत घ्यायला लागणार होती. तेच तिचं प्राक्तन होतं.

## पश्चात्ताप

वीस फुटांवर असणाऱ्या तुरुंगाच्या छोट्या खिडकीतून येणारा कोवळया उन्हाचा कवडसा आज तिलोत्तमा टक लावून बघत होती. किती वर्षं झाली, लहानपणी आपण हा उन्हाचा कवडसा पकडायला बघत असू. पण कधी हातातच येत नव्हता. आयुष्य असंच आपल्या हातात आहे म्हणता म्हणता निसटून गेलं. किती छान होतं आपलं आयुष्य! निरागस, संथ पाण्यासारख! अचानक सिद्धार्थ आयुष्यात आला आणि आयुष्य दुभंगून गेलं.

तिलोत्तमाचं बालपण खूप लाडात गेलं. दोन भावांची लाडकी बहिण, दिसायला अत्यंत सुस्वरूप, शिकायलाही हुशार. तिनं आपला जोडीदार स्वत:च निवडला. दिसण्यात डावा असलेला सिद्धार्थ हरहुन्नरी होता. त्याची जात मात्र तिलोत्तमाच्या कुटुंबियाना खुपली होती. म्हणून लाडकी असली तरी तिच्या लग्नाला मात्र भावांनी आणि आई वडिलांनी खूप विरोध केला. साम, दाम, दंड, भेद कशालाच तिने जुमानले नाही. घरच्यांच्या मनाविरुद्ध तिने सिद्धार्थ बरोबर संसार मांडला.

स्वत;च्या हुशारीच्या जोरावर सिद्धार्थ लवकरच नोकरीत खूप वर चढत गेला. पब्लिक रिलेशन मध्ये असणारा तो पार्ट्या टाळू शकत नव्हता. आणि पार्टीमधली दारूही. हातात आलेला सुरुवातीचा एकच प्याला नंतर चार वर्षातच

त्याची जिंदगी बनला. पहिल्यांदा आपल्या लाडक्या लेकीदेखत घरात ग्लास नको म्हणून टाळणारा सिद्धार्थ कालांतराने सुटीच्या दिवशी रीलॅक्स होण्यासाठी प्यायला लागला. तो दारुच्या इतका आहारी गेला कि मग त्याला दिवस रात्रीचेही भान राहिले नाही. आणि एक दिवस........

व्यसनापायी त्याची नोकरी गेली. मुलगी लहान, घरच्यांनी पाठ फिरवलेली अशा स्थितीत तिलोत्तमा नोकरी करू शकत नव्हती. गंगाजळीवर जेवढं निभावता येईल तेवढं धकवून नेलं. शांत आणि समंजस असलेली तिलोत्तमा आताशा छोट्या छोट्या कारणांवरून चिडचिड करत होती. नवरा बायको मधला संवाद आता संपायला लागला होता. पैसा असेल तरच जगणं शक्य होतं. आर्थिक विवंचना तिला त्रस्त करत होतीच, शिवाय दारूसाठी सिद्धार्थ आता तिच्याकडेच पैशाची मागणी करत होता. घरातला एक एक दागीनाही दुकानाची पायरी चढायला लागला. मोठ्या फ्लॅटचा असणारा निवारा आता एका कच्च्या बांधकामाच्या खोलीत बदलला. त्यासाठीही घरमालकाचा भाड्याचा तगादा सुरु झाला. कोंडीत सापडलेली तिलोत्तमा सैरभैर झाली होती. आणि एका दिवस हद्द झाली.

सिद्धार्थने लेकीच्या सोन्याच्या मनगट्यां बायकोकडे मागितल्या. ती ते द्यायला तयार होईना. त्याने तिच्यावर हात उगारला. एकेकाळी आपल्यावर जीवापाड प्रेम करणारा सिद्धार्थ आपल्यावर हात उगारतोय हे बघून एक क्षणभर तिलोत्तमा दु:खाने कोलमडून गेली. सिद्धार्थचा हात थांबत नव्हता. तोंडाने त्याची मागणी चालूच होती. मार असह्य होऊन तिच्या दु;खाची जागा आता रागाने घेतली. काही कळायच्या आतच जवळचा कोयता तिने उचलला. त्याला भीती दाखवायला उगारला, पण त्याने तिचा हात वरच्यावर पकडला. दुसऱ्या हाताने तो

तिला मारतच राहिला. तो चुकवत असतानाच कोयत्याचा हात त्याच्यावर बसला. घाव वर्मी लागला होता.

तिच्या लेकीची रवानगी अनाथाश्रमात झाली. कारण सरळ होते. तिचे आईवडील, भाऊ तिच्याकडे आता तर गुन्हेगार म्हणूनच बघत होते. त्याना काही तिची किंवा तिच्या लेकीची दया आली नाही. तिलोत्तमाचं मन दु:खाने विदीर्ण झालं. एका चंगल्या घरात जन्म घेतलेली आपली लेक सगळयाच सुखाना आपल्यामुळे मुकली. तिचा काही दोष नसताना, आश्रमात आयुष्य काढणं तिच्या नशिबी आलं. खरच, सिद्धार्थशी लग्न करून आपण चुकलो कि त्याला व्यसनापासून दूर करण्यात आपण कमी पडलो? त्याच्या प्रेमाने आपले डोळे बंद झाले होते कि त्याच्या व्यसनाकडे सुरुवातीला डोळेझाक करत होतो? कि त्याचा मार खाऊन सहन करायला पाहिजे होतं त्याचं अनिर्बंध वागणं? लेकीचं बाळलेणंसुद्धा पणाला लावायला पाहिजे होतं का?

अजुनही मला मोह घालणारा हा उन्हाचा कवडसा माझ्या लेकीच्या आयुष्यात मात्र रुक्ष वाळवंट बनून आलाय माझ्यामुळे. आईच्या चुकीच्या निवडीची असो किंवा बापाच्या व्यसनाची सजा असो, त्यापायी आपल्या निष्पाप छकुलीचं आयुष्य मात्र उध्वस्त होऊन गेलं. कुठलं गेल्या जन्मीचं पाप असेल कि त्या अभागी जीवाला अशी शिक्षा मिळावी? आई जिवंत असताना मुलीला अनाथ म्हणून जगायला लागावं यापरतं दु:ख ते काय! पश्चात्तापाच्या आगीत तिलोत्तमा पोळून निघत होती.

# मकसद

रेणूच्या वयाच्या पाचव्या वर्षापासून सौमित्र तिला सांभाळत होता. ज्या क्षणी त्याला कळलं आपली बहीण गतिमंद आहे, जवळपास त्याच क्षणापासून दादा म्हणून तिची देखभाल करण्याचा ठेका त्याने घेतला होता. सौमित्रला त्याच्याहून लहान आणखी दोन बहिणी होत्या. रेणू नंबर तीनची. सुखदा आणि स्वरदा या दोघी नॉर्मल होत्या. जेव्हा लहानपणी रेणूचे उच्चार स्पष्ट यायचे नाहीत तेव्हा सौमित्र ते समजून घ्यायचा. ती काय सांगतेय ते त्यालाच बरोब्बर कळायचे. आई वडिलांपेक्षाही जास्त त्याला बहिणीची काळजी होती. लहानपणी मित्र मैत्रिणी रेणूची चेष्टा करायचे. तिच्यासारखे बोबडे बोलून तिला चिडवायचे. खेळायला घेतानाही हिडीस फिडीस करायचे. या प्रसंगांनी रेणूच्या दादाला खूप त्रास व्हायचा. सौमित्र सतरा वर्षांचा झाला आणि त्याची आई गेली. वडील फिरतीच्या नोकरीवर. जबाबदारी सौमित्रवरच आली. बहिणीना त्यांचं आवरून देऊन शाळेला पाठवायचं. घरात काय हवं नको ते पहायचं. आईची जागा सौमित्र भरून काढत होता. वडील असूनही त्यांची भूमिका ते पार पाडू शकत नव्हते. संसारासाठी पैसा मिळवायचा एवढं एकच काम त्याना जमत होतं. सौमित्रची आई गेल्यापासून त्यांचं मन संसारातून उडून गेलं होतं. त्यांचं आयुष्य मशिनवत झालं होतं. सौमित्र बहिणींचा मायबाप झाला होता.

जसा जसा सौमित्र मोठा होत गेला तसं तसं त्याला उमगत गेलं कि आपणच रेणूचा पूर्ण वेळ सांभाळ केला पाहिजे. वडिलांच्या समजून घेण्यालाही खूप मर्यादा यायच्या. आई असताना ती रेणूचा सांभाळ करायची. पण आता रेणूच्या हालचाली विशीतही दहा वर्षाच्या मुलीसारख्या होत्या. सौमित्रने तिला हळू हळू

वाचनाची आवड लावली. तिच्याबरोबर वेगवेगळया विषयांवर चर्चा करायला लागला. तिला संगीत ऐकवत तिचा कानही असा तयार केला कि कोणताही राग ती पटकन ओळखायला लागली. संगीतात ती रमायला लागली. गाणी ऐकण्यासाठी ती कशी लावायची हेही त्याने शिकवले. पण तिच्या संगीत शिकण्याला मात्र मर्यादा होती. स्वैपाक तिला येत नव्हता पण त्याने चहा करायला शिकवलं. जेवण गरम करून घ्यायला शिकवलं. कमी होती फक्त वयाच्या मानाने असणाऱ्या समजुतीची. अशातच सौमित्र एमपीएससी परीक्षा पास झाला आणि त्याला मुलाखतीचं बोलावणं आलं. शेवटच्या क्षणी त्यानं ठरवलं, आपण ही नोकरी घ्यायचीच नाही मग मुलाखतीला कशाला जा! त्यानं दैनंदिन गरज भागवणारी साधीशी खाजगी कंपनीतली नोकरी पत्करली. जेणेकरून रेणूसाठी त्याला वेळ देता येईल. स्वत:चं आयुष्य त्यानं रेणूलाच वाहिलं होतं. लग्न न करता राहाण्याचं बंधन त्यानं स्वत:हून स्वीकारलं होतं. रेणू हेच त्याचं जग होतं, त्याचा श्वास होता.

रेणू कधी कधी हट्ट धरून बसायची दादा आज मला बरं वाटत नाही, तू कुठेही जायचं नाही. दादा अशावेळी पूर्णपणे तिची आई व्हायचा. काही न बोलता तिला मांडीवर झोपवायचा. रेणूची आंघोळ, वेणीफणी सगळंच सौमित्र करायचा. सौमित्रच्या दोघी बहिणींची लग्नं झाली. सौमित्रने तीही जबाबदारी पार पाडली. कारण वडिलानी ती जबाबदारी पार पाडायच्या आधीच या जगाचा निरोप घेतला होता. नोकरीवर जाताना बाहेरून कुलूप लावून शेजाऱ्याना सांगून तो जायचा. सगळं रुटीन व्यवस्थित बसलं होतं. मोबाईलवर ठराविक एकच नंबर आपल्या दादाचा कसा लावायचा हेही त्यानं रेणूला शिकवलं होतं. रोज ठरविक वेळी मी जेवले म्हणून तिचा त्याला फोन यायचा.

त्यादिवशी तिचा दुपारी फोन आला नाही. तिने फोनही उचलला नाही. शेजाऱ्याना फोन करून त्याने विचारले. थोड्या वेळापूर्वीच रेणू खिडकीतून हात करून आत गेल्याचे त्यांनी सांगितले. त्याचं मन द्विधा झालं. तिला शेजाऱ्यांनी पाहिलंय. म्हणजे वावगं काही घडलं नाही, किंवा तिने भलतंच काळजी करण्यासारखं काही केलं नाही. पण मग फोन का उचलत नाही? त्याच्या मनात उगाचच शंकेची पाल चुकचुकली. तिला काही झालं तर नसेल या भावनेनं त्याचं लक्ष कामावरून उडालं. पण हातातलं काम तर संपवणं गरजेचं होतं. अखेर ऑफिसची वेळ संपता संपता थोडा वेळ आधीच साहेबाना सांगून तो निघाला. त्याच्या कौटुंबिक परिस्थितीची जाणीव साहेबानाही होती.

दार उघडून कसाबसा घरात गेला. बेडरूममध्ये जमिनीवर रेणू अस्ताव्यस्त पडली होती. तोंडातून फेस आलेला दिसत होता. वरकरणी पाहता तिला आकडी आल्याची शक्यता वाटत होती. पण स्वैपाक घरात ओट्यावर झोपेच्या गोळयांची बाटली सौमित्रला सापडली. तिला सहजासहजी मिळू नये म्हणून ठेवलेली बाटली तिच्या हाताला लागली होती. आणि तिने ती घशात ओतून रिकामी केली होती. काय कारण असेल तिला या गोळया घेवूया आपण असं वाटाण्याचं ? आता काही विचार करण्यात अर्थ नव्हता. रेणूचं या जगातलं अस्तित्व तर संपलं होतं. पण आता सौमित्रसमोर प्रश्न उभा होता, आता आपल्या आयुष्याचा मकसद काय?

बऱ्याच मुश्किलीनं अनिशाचं लग्न ठरलं. लग्न न ठरावं असं वावगं तिच्यात काहीच नव्हतं. म्हणजे लग्नासाठी आवश्यक असणारे रूप गुण सगळंच तिच्या बाबतीत व्यवस्थित होतं. नाव ठेवायला, खोडी काढायला काहीच जागा नव्हती. दिसायला सुस्वरूप असणारी अनिशा उंचीपुरी, बांधेसूद होती. गोल गोरागोबरा चेहरा, काळेभोर मोठ्ठे डोळे, पिंगट कुरळे केस. योग्य रीतीने प्रत्येक वर्षी पास होत पदवीधर झाली होती. मग घोडं पेंड कुठे खात होतं? लग्नाचा विषय काढला कि तिच्या अंगावर शहारा यायचा. काळेभोर डोळे शून्यवत् व्हायचे. तिची आई पुन्हा पुन्हा समजवायला बघायची. अगं एकदा का लग्नाचं वय गेलं कि मग मुली जून दिसायला लागतात. नवऱ्या मुलाला मुलगी आवडेल अशी तर हवी. शिवाय संसार वाढवायच्या दृष्टीनेही मुलीचं वय वाढता नये. गरोदरपण, बाळंतपण योग्य वेळीच व्हायला पाहिजे. खूप खूप समजूत घालायची आई. पण तिचा आपला नन्नाचा पाढा!

तिला अभिषेकचं स्थळ सांगून आलं. नेहमीप्रमाणे तिचा नकारच होता. पण अभिषेकने तिला बाहेर कुठेतरी तिच्या नकळत पाहिलं होतं. त्याला ती आवडली होती. काही करून हीच मुलगी हवी असा त्याचा हट्ट होता. मध्यास्थांकरवी निरोप देऊनच अनिशाचे स्थळ सांगून यायला लावले होते. मध्यस्थांनी सारखा पाहण्याचा कार्यक्रम करा असा धोशा लावला होता. अनिशाच्या आई वडिलांची तयारी होती. पण खुद्द तिचीच तयारी नव्हती. मोठ्या मुश्किलीने तिने पहिले दोन कार्यक्रम मनाविरुद्ध पार पाडले होते. मुलगा आणि त्याचे नातेवाईक पाहायला आले कि अनिशा मख्खसारखी बसून राहायची.

चेहऱ्यावर कुठलेच भाव नसायचे. साहजिकच समोरच्या मंडळीना ते पसंत पडायचे नाही. नकार यायचा. आता पुन्हा एकदा मारून मुटकून तिला पहाण्यासाठी उभे करायला पाहिजे होते.

अभिषेक पहिल्या भेटीतच तिच्यावर लट्टू झाला. पण तिच्या चेहऱ्यावर किंचितसुद्धा स्मितरेषा नव्हती. अभिषेक कडून अनिशाला होकार आला. तिच्या आई आणि वडिलाना खूपच आनंद झाला. पण अनिशाने पुन्हा एकदा त्याला भेटायची इच्छा व्यक्त केली, मगच लग्नाचं ठरवीन म्हणाली. आता पुन्हा ही काय खेकट काढते कुणास ठाऊक म्हणून तिच्या आईवडिलाना घोर लागला.

“अंशू, हो माझी अन्शुच ! एवढं तडकाफडकी का बोलावलंस भेटायला?”

“लग्न करताना कोणताही आडपडदा दोघांमध्ये असता कामा नये असं मला वाटतं”

“ आपलं नातं नक्कीच पारदर्शी असणार आहे. दोघांपैकी कुणीही चुकलं तर प्रामाणिकपणे दुसऱ्याला सांगायचं हा आपल्यातला अलिखित नियम असायला हवा. म्हणजे एकमेकांवरचा विश्वासही दृढ होईल. आणि आपला संसारही छान होईल. पटतंय ना?”

“मला लग्नाचीच भीती वाटते. म्हणजे.......... आता कसं सांगू? पण पुरुष जवळ येणार या भावनेने मला अक्षरश: कापरं भरतं. ”

“......................................... ”

“मी सात वर्षांची असताना आमच्या शेजारी राहणाऱ्या काकांनी मला नको ते करायला लावलं होतं. माझ्या शरीराशी खेळले होते ते. नको तिथं हात लावला होता. तुझे गाल किती गोबरे आहेत म्हणून माझे कितीतरी पापे घेतले होते. त्यांच्या तोंडाला येणारी तंबाखूची दुर्गंधी अजूनही मला पोटात मळमळ आणते. त्या अजाण वयात मला कळलं नव्हतं. पण खूप घाण वाटली होती. कशीतरी मी त्यांच्या तडाख्यातून सुटून पळाले होते. काही दिवस त्या बाजूलाही फिरकले नाही. नंतर त्यांची बदली झाल्याचं कळलं आणि तिथून ते दुसऱ्या गावी गेले. घरी आल्यावर मी आईला सांगितलं. ” अनिशा हे सांगतानाही थरथरत होती.

अभिषेक प्रश्नार्थक चेहऱ्याने तिच्याकडे बघत राहिला. “ मग..... ”

“ आई बरेच दिवस खोदुन खोदुन चौकशी करत होती. मग मीही विसरून गेले. मैत्रिणींच्या, शाळा कॉलेजच्या वर्षात मागचं सगळं पुसलं गेलं. ”

“मग आता तुला का भीती वाटतेय?”

“दोन वर्षांपूर्वी एक सिनेमा पाहिला. त्यात एका लहान मुलीवर होणारा बलात्कार दाखवला होता. खरंतर प्रतीकात्मक दाखवलं होतं. पण तो सीन मला माझ्या लहानपणीचा तो प्रसंग ताजा करून गेला. तेव्हापासून पुन्हा एकदा पुरुषा विषयी, त्याच्या जवळ येण्याविषयी घृणा वाटायला लागली. ”

“मला हे सगळं सांगायला खरं खूप लाज वाटत होती. नाईलाजास्तव सांगायला लागलं. अजून कुणाचा होकार मला आला नव्हता. त्यामुळे हे कुणाला सांगण्याचं धारिष्ट्य करावं लागलं नव्हतं. तुमचा होकार आला आणि लग्न करावं तर तुमच्या सुखी संसाराचा विचका होईल. आणि न करावं तर नकाराचं कारण तुम्हाला काय देणार? आईलाही मी हे लग्न न करण्याचं कारण सांगू शकत नाही.

मनाचा खूप कोंडमारा व्हायला लागला. शेवटी ठरवलं. काही झालं तरी आज आपण मन मोकळं करायचं. ”

अभिषेक प्रसन्नसं हसला. “ मला तू आवडली आहेस. आणि तुझा हा पारदर्शीपणा तर मला खूपच भावला. तू मनात कसलीही भीती बाळगू नको. मला तुला दोन गोष्टी सांगायच्या आहेत. एक म्हणजे योनिशुचीतेच्या बुरसटलेल्या कल्पनेचा गंड समाजमनावर प्रचंड आहे. त्यामधून एखाद्या स्त्रीला सहजासहजी आजही बाहेर पडणं कठीण आहे. एखाद्या पुरुषाने स्त्रीवर केलेल्या अत्याचाराला त्या पुरुषाऐवजी स्त्रीलाच जबाबदार धरलं जातं. आणि त्याच्या अत्याचाराचे पडसाद स्त्रीच्या मनावर, शरीरावर आणि विचारांवर अगदी खोल ओरखडा उमटवतात. पुरुष करून सावरून नामानिराळा राहू शकतो. आणि दुसरी महत्वाची गोष्ट तुझ्याबाबतीत म्हणजे तू झाल्या प्रसंगाबद्दल आणि त्याच्या वाटत असलेल्या भितीबद्दल स्वत:ला दोषी अजिबात समजू नकोस. जेव्हा हे दोषी वाटण्याचं ओझं तू भिरकावून देशील त्याक्षणी तू स्वत:ला खूप मोकळं समजशील. तुझ्या मनावरचा ताण निघून जाईल. आणि तसं तू व्हावस असं मला मनापासून वाटतंय.

आपण तुझ्या मनाच्या कलानं घेऊ. एखाद्या मनोविकार तज्ञाला दाखवू. त्यावर मार्ग नक्कीच आहे. त्या जुन्या एका घटनेपायी तुझ्यावर झालेला हा परिणाम आपण दोघं मिळून पुसून टाकू आणि नव्या दमाने आयुष्याला सुरुवात करू. आता आपल्या जीवनात असं काही घडलं होतं याचा हळूहळू विचार मनातून काढून टाक. ” अभिषेकने दाखवलेल्या विश्वासाने अनिशाच्या मनावरचं दडपण कमी झालं होतं. हलकेच तिच्या चेहऱ्यावर हसू उमललं. अनिशाला खूप हळुवारपणे घ्यायला लागणार होतं. भविष्यकाळात इतिहासाची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी आता अभिषेकला घ्यावी लागणार होती.

## सुबह का भूला.........

मुकुल पराभूत होऊन मायदेशी परतला होता. त्याचे आणि डोरोथीचे संबंध आता संपुष्टात आले होते. त्याने तिच्याशी जुळवून घ्यायचा खूप प्रयत्न केला पण पाश्चिमात्य संस्कृतीचे प्रतीक असलेली डोरा तडजोड करायला तयार नव्हती. कुठल्याही बाबतीत स्वत:चेच म्हणणे खरे करणारी डोरा त्याला पंधरा वर्षात आपलेसे करू शकली नव्हती. त्याने हात टेकले आणि खचलेल्या मनाने भारतात आला. घरात काय वाढून ठेवले असणार याची त्याला साधारण कल्पना होती. आई आपल्याला स्वीकारणार नाही. आणि जान्हवी तर कुठे आहे कुणास ठाऊक!

स्वत:च्याच पसंतीने केलेल्या जान्हवीला त्याने टाकले होते. आता कुठल्या तोंडाने तो डोराविषयी आईकडे तक्रार करणार होता? जान्हवीशी केलेले लग्न हे खरंतर आईवडिलांच्या मनाविरुद्धच होते. रूपाने सुमार असलेली जान्हवी मुकुलपेक्षा चार वर्षांनी मोठी होती हे त्या विरोधामागचे खरे कारण होते. पण त्याला जर आवडली तर आमची ना नाही या निर्मम हेतूने त्यांनी जान्हवीला स्वीकारले होते. आता या क्षणी जान्हवी असती तर! तिने मला नक्कीच आधार दिला असता. केवढा भरभक्कम सपोर्ट होता तिचा. बिचारी! पण बिचारी तरी कसं म्हणावं तिला! ती मनाने खंबीर आहे. कुठल्याही संकटाला घाबरून न जाता धीराने तोंड देणारी आहे. पण ज्याच्यावर आपण प्रेम केले त्यानेच प्रतारणा का करावी असं तिला नक्कीच वाटलं असणार. आपल्या वागण्याने तिच्यावर काय प्रसंग आला असेल याची त्याला आता कल्पना आली. पण आता वाटून काहीच उपयोग नव्हता. त्यावेळी आईशी या विषयावर बरीच झाडाझडती झाली होती. बाबांच्या नाजुक हृदयाने लेका सुनेच्या संसाराची अशी झालेली धूळधाण बघून केव्हाच राम म्हटला होता. त्याने भारतातल्या आपल्या आईशीही फारसे संबंध ठेवले नव्हते. जान्हवीशी तर नाहीच नाही.

जर्मनीला गेल्यावर मुकुल तिकडे स्थिरस्थावर होईपर्यंत जान्हवीचा आणि त्याचा संसार छान चालू होता. आणि एक दिवस डोरोथीशी त्याची जान पहचान झाली आणि हळूहळू तो तिच्या प्रेमात पडला. तो इतका तिच्या प्रेमात बुडाला की जान्हवीचे त्याच्यापेक्षा वयाने मोठे असणे आता त्याला काचू लागले. तिचा समंजसपणा जो त्याला सद्गुण वाटत होता, तोच त्याला बावळटपणा वाटायला लागला. तुझ्यामध्ये स्पार्क कसा तो नाहीच हे त्याचं नेहमीच बोलणं झालं. त्याच्या आवडीला प्राधान्य देणारी जानू आता त्याला शेळपट वाटायला लागली.

धडधडत्या अंत:करणाने मुकुलने दाराची बेल वाजवली. एकदा, दोनदा, तीनदा. त्याने परत जाण्यासाठी पाऊल उचलले, आणि दाराचा आवाज झाला. वळून बघितले तर दार उघडायला चौदा पंधरा वर्षांची एक नाजुकशी मुलगी आली होती. प्रश्नार्थक मुद्रेने त्याने तिला विचारले, “इनामदार इथेच रहातात ना?”

“हो, कोण आलय म्हणून सांगू?”

“मी मुकुल इनामदार. ”

ती एक क्षणभर पाहतच राहिली आणि आलेच हं म्हणत आत गेली.

थोड्या वेळाने ती परत आली आणि दार उघडून त्याला ती आत घेऊन गेली. घराचे आतले स्वरूप खूप बदलले होते. भिंतीवर बाबांच्या फोटोशेजारी

त्याच्या आईचाही फोटो होता. फोटोला हार घातला होता. त्याच्या काळजात गलबललं.

काही वेळाने जान्हवी आली. व्हील चेअरवर होती. मुकुलला एकापाठोपाठ एक धक्के बसत होते. पाहिल्यापेक्षा थोडी बारीक दिसत होती. चेहऱ्यावर पोक्तपणा आला होता. केस अकाली पिकले होते. परिस्थितीशी झगडून आलेला समंजसपणा चेहऱ्यावरच्या सात्विक भावाला दुजोरा देत होता. पंधरा वर्षात पूलाखालून बरंच पाणी वाहून गेलं होतं. गेलेले दिवस परत येणं शक्यच नव्हतं.

" बस. थकलेला दिसतोयस. " जान्हवी बोलली.

मनू, तू नेहमी विचारतेस ना, तो हा तुझा बाबा. "

"........... "

मनू आणि मुकुल एकमेकांकडे पहात होती. आपण परिचित आहोत की अपरिचित या भावनेतून. रक्ताचे नाते असलेले दोन जीव एकमेकांना अनोळखी नजरेने बघत होते. मुकुलच्या चेहऱ्यावर अनेक प्रश्न दिसत होते. त्याला कुठून सुरुवात करावी समजत नव्हते. जान्हवीने ते ओळखले आणि सांगायला सुरुवात केली. मुकुलने झिडकारल्या बरोबर जान्हवीला त्याच्या आईने प्रेमाने आश्रय दिला. ती कुठे जाणार होती? दोन जीवांच्या जान्हवीला मुकुलचे घर सोडून काही आधार नव्हता. आपल्याला सुनेला लेकीसारखे सांभाळायचे आहे हे त्याच्या आईने ओळखले. दोघी एकमेकींच्या आधाराने राहायला लागल्या. मनूचा जन्म झाला.

दोघींना जगायला कारण मिळालं. जान्हवी नोकरी करत होती आणि घरची आघाडी मुकुलची आई पहात होती. दोघीत मायलेकीच नात निर्माण झालं होतं.

निसर्गाचा नियमच आहे की ज्याची सहनशक्ति अमर्याद आहे त्यालाच नेहमी सत्वपरीक्षेला तोंड द्यायला लागत. जी व्यक्ति किरकोळ कारणाने नामोहरम होते त्याला फार कळ सोसावी लागत नाही. आठ वर्षापूर्वीची गोष्ट. आजी शाळेतून मनुला घेऊन येत होती ! समोरून येणारा ट्रक आजी आणि नातीला आता उडवणार हे जान्हवीच्या लक्षात यायला फारसा वेळ लागला नाही. जिवाच्या आकांताने तिने दोघींना ढकलले. मनू आणि तिची आजी बाजूला उडून पडल्या. आणि जान्हवीचे दोन्ही पाय मात्र ट्रकच्या चाकाखाली आले. मनू सुरक्षित राहिली. तिला थोडीफार दुखापत झाली, आजीने आठ दिवसांनी या जगाचा निरोप घेतला. जान्हवीच्या नोकरीचे स्वरूप फक्त बदलले. आजच योगायोगाने मनुला पुनर्जन्म मिळल्याचा दिवस होता. आणि आज तिचा जन्मदाताही तिच्यासमोर उभा होता.

अंगावर सरसरून काटा यावा अशी आयुष्याची जीवघेणी कहाणी ऐकल्यावर मुकुलला काय बोलावे हेच कळेना. या सगळया परिस्थितीला नकळत आपणच जबाबदार अहोत. हे त्याला कळून चुकले होते. आता चुकीला प्राय:श्चित्त काय? पुढे जायचे तर कसे? मागे येणे शक्य नव्हते. कोंडी फुटणार कशी? स्वत:च्या पराभूत मनाची कल्पना बोलता बोलता त्याने दिली होती. तिघांमध्ये घर खायला उठणारी शांतता होती. कुणीच काही बोलत नव्हते. मुकुल निरोप घेण्यासाठी उठला. दारापर्यंत गेला.

“बाबा थांबतोस ना!” मनूच्या आवाजाने तो थबकला. गोंधळात पडलेल्या मुकुलची नौका किनाऱ्याला लागली होती.

# गुरुदक्षिणा

पंडीतजीनी खर्जातला षड्ज लावला. पहाटेच्या शांत वेळी त्यांचा धीर गंभीर सा शिष्याना एकाग्रचित्त करत होता. धुक्याचा पांढरा पडदा हलकेच बाजूला सारून रविकिरणांनी दर्शन द्यावे आणि काही सेकंदात साक्षात सुर्यनारायण प्रकट व्हावे तसा गळयाच्या मुलायम बंधातून पंडितजींचा षड्ज बाहेर पडत होता. पंडितजी नेहमी शिष्याना सांगायचे, “स्वराची आराधना म्हणजे साक्षात ईश्वर प्रणिधान. परमात्म्याशी तादात्म्य पावण्याचा एकमेव मार्ग. संगीत साधना म्हणजे तपस्या. आपणच स्वत:ची केलेली परीक्षा. इथे अहंकाराला थारा नाही. स्वरापुढे नतमस्तक जो झाला त्याला स्वर साध्य झाला. आमचे गुरु म्हणायचे एक सूर साधे तो सब सीधे. म्हणजे एक स्वर, एक तान, एक आलाप घोटून बसवला कि त्या पठडीतले सगळे स्वर, संगीत तुम्हाला शरण येते. ” अशा संस्कारांच्या पठडीत तपन तयार झाला होता. तपन पंडितजींचा अतिशय लाडका शिष्योत्तम आणि पुत्र.

तपन डोळे मिटून षड्जाच्या समाधीत गुंग होता. इतक्यात नंदिनीची अस्फुट किंकाळी त्याला ऐकू आली. “भैय्या! बाबूजी ........ ! तपनचे डोळे खाडकन उघडले, त्याच्या बाबुजींचा षड्ज गळयातच अडकला होता. आणि तानपुऱ्यावर त्यांनी मान टेकली होती. बंद डोळयातून त्यांची समाधी लागल्यासारखे वाटत होते. तपन झटकन पुढे झाला. त्याने हलकेच पंडितजीना झोपवले. डॉक्टरांना बोलावले. पण उपयोग झाला नाही.

पंडितजी जाऊन महिना झाला होता. माणसांची प्रचंड रीघ आता कमी झाली होती. दैनंदिन व्यवहार पूर्ववत सुरु झालेच होते. पण दु:खात अडकलेल्या तपनला आणि नंदिनीला रियाझ सुरु करायला काही मन घेत नव्हते. क्लाससाठी शिष्य परिवार सारखा येऊन बसत होता. पूर्ववत गाण सुरु करणं हीच पंडितजीना खरी श्रद्धांजली होती. मागची उजळणी झाली. आणि तपनने पंडितजींची चिजांची वही काढली. पंडितजींच्या गादीला प्रणाम करून तिलक कामोद मधली चीज सुरु केली, "नीर भरन कैसे जाऊँ सजनी अब..... "

क्लास संपल्यावर तपनने वहीतल्या चीजा बघायला सुरुवात केली. वहीचे प्रत्येक पान जुने झाल्याने विस्कळीत झाले होते. त्यातच एक पान होते. ते एक पत्र होते. खूप जुने. तेही जीर्ण झाल्यासारखे वाटत होते. त्याची उत्सुकता चाळवली गेली.

" प्रिय तपन,

तुला हे पत्र हातात मिळेल, तेव्हा मी या जगात असणार नाही. पण बाळा मी तुझा जन्मदाता नाही. तू एका मशिदीच्या बाहेर मला सापडलास. त्यामुळे तू हिंदू कि मुस्लीम मला माहित नाही. नंदिनीचा जन्म झाल्यावर तुम्हा दोघानाही आम्ही आमच्या हिंदू संस्कारातच वाढवले. मी जिवंत असेपर्यंत तुला हे कळले तर तुला मी कदाचित पारखा होईन. पुत्रप्रेमाला मी मुकेन म्हणून हे सगळ गुलदस्त्यातच ठेवलं.

नेहमी गुरु पौर्णिमेला तू मला विचारायचास कि बाबूजी, मी जरी तुमचा मुलगा असलो तरी तुमच्याकडून संगीत विद्या शिकतोय, म्हणून तुम्ही माझ्याकडून गुरुदक्षिणा घ्या. मला जे काही शक्य आहे ते मला तुमच्या पायाशी अर्पण करू द्या. मी तुझ्या जन्माचे रहस्य गुप्त ठेवले. गानविद्या तुम्हा दोघानाही, तुला आणि नंदिनीला मी हातची न राखता दिली. कदाचित तू मुस्लीम असशील तर तुला तुझ्या मूळ संस्कारात न वाढवता मी हिंदू संस्कारात वाढवले, या सत्याने तुझ्या मनात माझ्याबद्दल कटुता निर्माण होईल म्हणून मी माझ्या हयातीत काही सांगायचे नाही असे ठरवले. तुझ्या या मजबूर पित्याला माफ करशील ना पोरा? ही एवढी गुरु दक्षिणा देशील का बाळा?”

# प्रत्यक्षाहुन प्रतिमा उत्कट !!

अनिरुद्धचा थिसीस जवळजवळ पूर्ण होत आला होता. थोड्या टिप्स लिहायच्या होत्या. काही संदर्भ बघायचे राहिले होते. त्या संदर्भावरून शेवटचे प्रकरण पूर्ण झाले कि शेवटचा हात फिरवायचा. चार दिवसांनंतर एकदा प्रबंध तिर्हाइत नजरेन व्यवस्थित वाचून काढायचा आणि सबमिट करायचा कि डॉक्टरेटच्या यादीत त्याचे नांव झळकणार होते. बस्स आता दोनेक महिन्यांचे काम बाकी राहिले होते. गेले साडे तीन वर्ष दिवसरात्र खपून, प्रबंधाच्या विषयाचा अक्षरश: कीस पाडला होता. विषयाच्या मांडणीत, माहितीमध्ये काही उणीव राहू नये असे त्याला मनापासून वाटत होते. त्या दृष्टीने तो डॉ. नगरकर यांच्याशी सतत संपर्कात होता. नगरकर सरांनी त्याला खूप चांगलं मार्गदर्शन केलं होतं. सर म्हणजे त्याचे आदर्श होते. ते सांगतील ते प्रमाण असं वाटायचं. आज त्याला सरांनी तातडीने बोलावलं होतं.

“अनिरुद्ध तुझ्या थिसीसमधली चार प्रकरण आपण बदलू. मला ती योग्य वाटत नाहीत. ते चॅप्टर तू काढूनच टाक. त्यामध्ये मला फारसं काही तथ्य दिसत नाही. ” इतक्या कष्टाने जमवलेली माहिती, त्यावर केलेला अभ्यास हे सगळ मातीमोल होणार होतं. पण सरांनी त्याला अतिशय योग्य प्रकारे समजावून सांगितलं आणि ती चार प्रकरण काढायला तो तयार झाला. पुन्हा वेगळया चॅप्टर्सचा अभ्यास करावा लागणार होता. डॉक्टरेट पुढे गेली होती.

महिन्याभराने त्याला संध्या भेटली. खूप आनंदात दिसत होती. तिचा थिसीस पूर्ण झाला होता. तिचेही गाईड डॉक्टर नगरकरच होते. तिला डॉक्टरेट मिळाली. त्याने सहजच तिचा प्रबंध हातात घेतला. चाळला. क्षणभर तो गोंधळून तिच्याकडे पहातच राहिला. ही तिची चूक कि त्याची कि सरांची? त्याची रद्दबातल ठरवलेली प्रकरणं तिच्या प्रबंधात जशीच्या तशी होती.

सहज गप्पा मारताना त्याचा मित्र एकदा त्याला म्हणाला होता, “माणूस कितीही मोठा झाला ना तरी त्याचे पाय मातीचे असतात असं बऱ्याच वेळेला बघायला मिळते. गुड्डी सिनेमात धर्मेंद्र एकावेळी चार गुंडाना लोळवतो. तीच प्रतिमा गुड्डीच्या मनात त्याच्याविषयी असते. पण तरुण, अल्लड जया भादुरीच्या मनातली हिरोची प्रतिमा काढण्यासाठी, ते फक्त सिनेमातच शक्य असतं हे दाखवायला त्याच्यावर खोटे मारेकरी घालावे लागतात. अध्यात्मिक माणसाचे मनसुद्धा, तो जेवढे चांगले दाखले देतो तेवढे चांगले असतेच असे नाही. बाह्यरुपावर आपण भुलतो. चकाकते ते सगळेच सोने नसते यावर विश्वास ठेवावा लागतो. नाहीतर आपला भ्रमनिरास होतो. कधी कधी हाथी के दात खाने के और दिखाने के और असे असते. म्हणूनच वेळोवेळी आपण ज्यावर विश्वास ठेवतो ते कितपत सत्य आहे हे पारखून बघावे लागते. कधीतरी मूर्तीभंजन आवश्यक असते रे”

## ........... तर माझं काय चुकलं

यामिनी: पहिल्यापासून मला आई बाबांनी खूप लाडात वाढवलं. तोंडातून काही बाहेर पडायचा अवकाश कि दोघंही मला ती गोष्ट मिळवून द्यायचे. पण एक गोष्ट मात्र त्यांच्या मनात असूनही ते देऊ शकत नव्हते. ती म्हणजे वेळ. आणि मला तर वेळच खायला उठायचा. शाळा सुटली कि मी घर नावाच्या बंदिस्त खोलीत एकटीच असायची. शाळा संपली. कॉलेजमधले दिवस मात्र अगदी फुलपंखी होते. बऱ्याच गोष्टी आम्ही मैत्रिणी शेअर करायचो. मैत्रिणींमुळे नंतर मला आईबाबांची गरज वाटेनाशी झाली. त्यांच्यापासून खूपशा गोष्टी मी लपवून ठेवायला शिकले. आणि ऐन तारुण्यात मी एका हुशार मुलाच्या प्रेमात पडले. जगाच्या दृष्टीने तो एक ड्रायव्हर होता. त्याचे आणि आपले संस्कार कसे जमणार यापेक्षा, कोणत्याही परिस्थितीत कितीही संकटं आली तरी मी त्याच्याशी संसार करेन हा विचार प्रबळ ठरला. आम्ही लग्न केल. मी अगदी एका खोलीच्या घरात रहायला आले. सुरवातीचे काही दिवस स्वप्नवत गेले. आणि काही दिवसातच बाई आणि बाटली दोन्हीचाही त्याला नाद लागला. मी शिक्षणही अर्धवट सोडलं होतं.

एक दिवस........ तो एका घाणेरड्या बाईला घेऊन घरी आला. तिच्याबरोबर मला जायला सांगितलं. ती बाई मला घेऊन नाक आणि मन गुदमरवून टाकणाऱ्या एरियात आली. एका माणसाबरोबर तिने मला जायला सांगितलं. पण मी पळत सुटले. तिथे माझ्या ओढणीने माझा घात केला. ती तिच्या हातात आली. त्याक्षणी मी गरकन मागे फिरले आणि कांही कळण्याच्या आत माझाच दुपट्टा तिच्या गळया भोवती आवळला. समोर दिसणाऱ्या संकटाची चाहूल लागताच मी वाघीण झाले होते. जीवाच्या कराराने दुपट्टा आवळत गेले आणि काही

वेळातच ती निपचित पडली. मी जाणून बुजून गुन्हा केला नाही. चांगल्या संस्कारात घडलेला माझा जीव नरकात जाण्यापासून मी वाचवला. एवढंच मी केलं ना ? .............. तर माझं काय चुकलं?

श्यामली : माझ्या मर्जीविरुद्ध मला कॉलगर्ल व्हावं लागलं. घरची परिस्थिती खूप गरीब. आई लोकाकडे धुण्याभांड्याची कामं करायची. आणि बाप दारू पिऊन आईला मारायचा. तो काम धंदा काहीच करत नव्हता. पण दारूला पैसे मात्र आईकडून घ्यायचा. एक दिवस दारुच्या नशेत त्याने आईच्या डोक्यात पाटा घातला. वर्मावर घाव बसला, आई खलास झाली. बाप त्यातून सुटला. पण माझी आणि बापाची दोघांचीही जबाबदारी माझ्यावर पडली. मी बाराव्या वर्षीच लोकांकडे घरकाम करायला जायला लागले. मला शिक्षणाची आवड होती. आई असेपर्यंत शाळा म्हणजे काय हे बघितल होतं. घरकाम करून आमचं भागेना. गरिबीत दोन घास कमी खाल्ले असते. पण बापाची दारू काही सुटत नव्हती. शिवाय त्याच्या आजारपणाचा खर्च वाढत होता. शेजारच्या मैत्रिणीनं सुचवलं. बारबाला म्हणून काम करायला लाग. डान्स बार बंद झाल्यावर पुढे काय हा प्रश्न उभा राहिला. मग या व्यवसायात उतरले. दोघंजण माझे दोस्त झाले. त्यातल्या एकावर माझं खरंखुरं प्रेम होतं. आम्ही दोघांनी एकत्र संसाराचं स्वप्न बघितलं होतं. एक दिवस माझ्यावरून त्या दोघात खूप मारामारी झाली. माझ्या प्रियकराला मार बसतोय हे मला बघवेना. रागाने मी हातात मिळालेल्या हातोडीने दुसऱ्यावर वार केला तो त्याच्या डोक्यावर बसला. आणि तो गेला. माझ्यासमोर माझ्या होणाऱ्या पतीला मार बसत होता. माझ्या संसाराचं स्वप्न धुळीला मिळवणाऱ्या त्या माणसाला मी मारलं........... तर माझं काय चुकलं?

कालिंदी: करियर खूप छान केली मी. आयुष्यात कधी अपयश म्हणून बघितलं नाही. ज्या क्षेत्रात भाग घेईन त्यामध्ये पहिला नंबर कधीच सोडला नाही. कॉम्प्युटर इंजिनियर झाल्यावर कॅम्पस इंटरव्यू मधेच मला निवडल. कंपनीच्या कामाच्या निमित्ताने देशापरदेशात खूप ठिकाणी फिरले. जोडीदारही मनासारखा मिळाला. आईवडिलाना वर संशोधनाचा त्रास नाही पडला. संसार व्यवस्थित चालला. नवरा हौशी. पण योगायोगच विचित्र. माझ्या मैत्रिणीचा नवरा गेला. ती एकाकी पडली म्हणून तिला धीर द्यायला दोघे जात होतो. दोन अडीच वर्षांनी माझ्या लक्षात आलं कि माझा नवरा तिच्यात गुंततोय. पहिल्यांदा त्याने उडवून लावले. पण नंतर त्यावरूनच आमचे वाद व्हायला लागले. माझा पती माझ्या नजरेसमोर तिने ओढून नेला. आमच्यातला वाद विकोपाला पोचला. मला आता नवऱ्याबरोबर राहायचंच नव्हतं. पण तेवढाही पेशन्स त्याच्यात नव्हता. एक दिवस त्याने मला फिरायला नेल तळ्याकाठी आणि ढकलून दिल. त्याचा कयास चुकला. मला पोहता येत होतं. घरी परत आलेलं बघितल्यावर तो हतबुद्ध झाला. आणि आपले बिंग बाहेर फुटू नये म्हणून त्याने माझ्यावर सुरीचा वार केला. मी कसाबसा तो चुकवला आणि त्याच्याकडे फिरवला. चुकून तो त्याच्या वर्मी बसला. माझे जीवन संपवणाऱ्या माणसापासून माझा बचाव करत होते मी......... तर माझं काय चुकलं?

माणसानं कितीही ठरवलं तरी तो नियतीच्या हातातल खेळण आहे. मनात येईल ते करू शकत नाही. कधीकधी तसं केलं तर त्याचा परिणाम विपरीतच होतो. चुकलं नसलं तरी शिक्षा मिळते. आपण सगळीच विधात्याच्या रंगमंचावरची थोडा काळ अभिनय करणारी पात्रच आहोत नाही का?

# ओळख

“ कशी झालीय खिचडी?” राधाने न राहवून विचारलं. खिचडीमध्ये चांगलं किंवा वाईट होण्यासारख काही असतं का? इति निहार. कुठलाही पदार्थ ती निगुतीनं करायची. तो काही प्रतिक्रिया देणार नाही हेही तिला माहित होतं. त्याचा थंड प्रतिसाद तिच्या अंगवळणी पडला होता. पण तरीही तिच्याच्याने विचारल्याशिवाय गप्प बसवत नव्हतं. नेहमीच्या सरावाने ती कामाला लागली. आणि घरचं सगळ आवरून ती ऑफिसला निघाली.

“राधा तू आणखी दोन पावलं पुढे जा. अमुक एक केलंस कि पुढची स्टेप तुला जास्त आनंद देईल काहीतरी मिळवल्याचा, ध्येय साध्य केल्याचा आनंद होईल. ” निहारच बोलणं हे असं असायचं. “जिथे आहेस तिथुन कितीतरी पुढे जायचं आहे तुला. ” पण राधाच्या मनात नेहमी यायचं. “ध्येयासाठी किती पुढे पुढे जावं माणसानं याला काही मर्यादा आहेत कि नाही, शेवटी ध्येयाचा प्रवासच खरा उपभोगायचा ना!” अगदी निकराचा प्रयत्न करून ती कोणतीही गोष्ट अत्यंत छान करण्याचा प्रयत्न करायची. पण त्यावर तिला म्हणावं तसा प्रतिसाद निहारकडून मिळायचा नाही. आपण आपल्या आनंदासाठी करतोय हा विचार करून, मागचं मागे टाकून नव्या जोमाने पुन्हा नव्या व्यापात गुंग व्हायची. कधीतरी स्वत:कडेच पाहताना खरच आपण काय मिळवलं, याचा हिशेब करत असायची. तेव्हा मनाशी खंतावायची. अत्यंत हुशार अशा दोन मुलांची ती आई होती आणि जिज्ञासू,

बुद्धिमान, कर्तृत्ववान माणसाची पत्नी. पण ही ओळख तिला स्वस्थ बसू देत नव्हती. आपल्या कष्टांच चीज होत नाही असं काहीस तिला वाटायचं. कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन हे वचन तिला कळायचे पण उमगायचे नाही.

निहारच्या या बोलण्यामुळे आपण नेहमी कमी पडतो असं तिला वाटायचं. संगीत विशारद असलेली राधा गायचीही सुरेख. अनेक ट्रेक्स तिने केले होते, एव्हरेस्टच्या बेस ट्रेक सकट वीस एक गिर्यारोहणाचे पराक्रम तिच्या खाती जमा होते. स्वत: कथा लिहायची. कथाकथन स्पर्धेतही तिने भाग घेतला होता. काही दिवसांपूर्वी तिने स्वत: लिहिलेली कथा निहारला दाखवली होती. कथा साधी सरळ, पण मनाचा ठाव घेणारी नक्कीच होती. निहारने त्यात एक दोन करत अनेक सुधारणा सुचवून कथेचा मूळ गाभाच हलवून टाकला होता.

बऱ्याच वर्षांनी भेटलेली तिची शाळेमधली मैत्रीण जयंती मात्र तिच्या कर्तृत्वाने भारावून गेली होती. अगं कित्ती कायकाय करतेस तू? वेळ तरी कसा मिळतो हे एवढं करायला? आणि जयंतीने पुढच्याच भेटीत शाळेतील वर्ग मैत्रीणींच्या मेळाव्याला तिला आमंत्रित केल. चक्क पाहुणी म्हणून! Jack of all trades, master of none असणारी राधा स्टेजवर काही बोलायला, आपले अनुभव सांगायला उभी होती. बरोबरीच्या मैत्रिणींपेक्षा कणभर का होईना सरस होती. राधाच्या समोर तिच्यामागे एक वर्ष असणाऱ्या सगळया मुलींची म्हणजेच बायकांची गर्दी होती. जयंतीनं राधाच्या व्यक्तिमत्वाचे एक एक पैलू सांगायला सुरुवात केली आणि राधाला आपण कुणी आहोत याची जाणीव झाली. त्याचवेळी

तिला इरावती कर्वेन्चा परिपूर्ती हा लेख आठवला. अमक्याची सून, तमक्याची पत्नी ही ओळख लेखिकेला अपुरी वाटत होती. आपल्या वर्गातल्या कर्व्याची आई या एका ओळखीने तिला आपल्या व्यक्तिमत्वाची ओळख परिपूर्ण झाल्यासारखे वाटते. राधाच्या नजरेसमोर एक वेगळच व्यक्तिमत्व साकारायला लागलं. खरच मी इतक काही करते! या भावनेतून तिच्या चेहऱ्यावर आपोआपच एक समाधान झळकायला लागलं. आपल्या व्यक्तिमत्वाची परिपूर्ण ओळख जयंतीने करून दिली, आणि हीच खरी मी आहे असे तिला मनापासून वाटले.

## मैत्रिणीची गोष्ट

ती मैत्रीणीला सांगत होती. अगदी मनमोकळं. कुठल्याही गोष्टीचा आडपडदा मनात न ठेवता.

मला कन्फेस करायचं आहे.

काय?

........ माझ्याच बाबतीत चुकलेलं माझं गणित.

मग त्यात कन्फेशन कसलं आलय गं,

एखादी चूक कबुल करताना आपण मनात असेल ते सगळ बोलून टाकतो ना तसंच मलाही वाटतंय. माझे खांदे जबाबदारीच्या ओझ्याने वाकून गेलेत गं ! लोकांच्याकडून मला मिळणारी कौतुकाची थाप हेच माझं सर्वस्व मानलं मी. स्वत:च्या मनाचा विचार केला नाही.

बरोबर आहे. मोठेपणाची झूल तुझ्या अंगावर लहानपणापासूनच पांघरली गेली. त्या ओझ्याने तुझे नाजूक खांदे जडावून गेले. ना तुझ्या आईवडिलाना

त्याची जाणीव झाली, ना तुझ्या नातेवाइकाना, ना तुला स्वत:ला. लोकांनी तुला बहाल केलेली चांगुलपणाची ही उबदार शाल तुला त्यातच गुरफटवून गेली.

“ स्नेहा, तू ताई आहेस ना, मग कसं शहाण्यासारखं वागावं बरं. बिना आणि रीनालाही मग आपल्या ताईसारखच वागावसं वाटेल ना ” “ स्नेहाराणी बीना रीनाचा अभ्यास झालाय का बघ ग! उद्या त्यांचा पेपर आहे ना. मला सवड नाही त्यांच्याकडे लक्ष द्यायला. आणि ताईने अभ्यास घेतला कि दोघी अगदी खुश असतात. ”

“जरा मला भाजी चिरून देते स्नेहा? म्हणजे लवकर आटपेल काम माझं. ” “आणि उद्या निरुताई तिच्या मुलाना घेऊन येतेय. एस्सेल वर्ल्डला त्यांना नेता येईल. आणि स्नेहा असली कि कसली काळजी नसते बाई, असं निरुताई सुद्धा म्हणाली हो!

“आई बाबांच्या माघारी बीना रीनाला काही कमी पडू दिल नाही, अगदी स्वत:ची आवड बाजूला ठेवून. मोठेपणा वाटत होता मला हा त्याग करायला. प्रसंगी त्यांची आई झाले. मध्यंतरी वाट चुकलेल्या बीनाला मार्गावर आणल. तेव्हाही सगळयांनी नावाजलं. आईची उणीव भासू देत नाही पोरीना. ”

मैत्रीणीच्या कुशीत शिरून स्नेहा मनसोक्त रडली. खूप लहान झाली ती. मला लहान होऊन जगायचंय. हट्टही करायचेत. स्फुंदत हुंदके देऊन देऊन, श्रांत, क्लांत झाल्यावर ती तशीच तिच्या मांडीवर डोकं ठेवून शांत पडून राहिली. खोट्या कौतुकाने वाकलेली तिची मान, झुकलेले खांदे, कुबड आलेली पाठ मैत्रीणीच्या जादुई स्पर्शाने क्षणात हलके झाले. आणि स्नेहाला खूपच आराम वाटायला लागला.

“अगं प्रत्येक व्यक्तीत एक लहान मुल दडलेलं असत. तू उगाच थोरपणा जपायला गेलीस आणि स्वत:चं व्यक्तित्व हरवलंस. आता तुला मिळेल आपला मार्ग. ” मैत्रीण तिच्या केसातून अलवारपणे बोटं फिरवत राहिली. तिच्या गालावरून नाजूकपणे प्रेमाने हात फिरवत राहिली. मैत्रीणीच्या पिसासारख्या मृदू मुलायम स्पर्शाने स्नेहाला जाग आली. खिडकीतून पहाटेचा थंडगार वारा पडद्याला लहरवत होता. गालांना जाणवणारा तो पडद्याच्या आपुलकीचा स्पर्श! त्या स्पर्शाने ती मनोमन खुश झाली. पडल्या जागेवरूनच तिने डोळे किलकिले करून पहिले. पडदा आणि खिडकीच्या फटीतून दिसणारा आकाशाचा लालिमा ती अर्धमिटल्या डोळयांनी मनसोक्त पाहात राहिली. रात्रीचा अंधार मिटवणारा आणि नव्या दिवसाची नांदी सांगणारा, नवजात अर्भकासारखा आकाशाचा तो लाल तुकडा, आपल्यात स्वत्वाची उर्जा निर्माण करतोय असं वाटल तिला. आसमंतातून हलकेच तरंगत येणारे भैरवचे स्वर मनाला उत्फुल्ल करत होते. तिच्या पंखाना आता आत्मशक्तीच प्रचंड बळ लाभलं होतं. आता ती जे काही करणार होती, जगणार होती ते होतं फक्त तिच्या स्वत:साठी, लोकांच्या कौतुकभरल्या नजरांसाठी नाही. मुक्त मनान ती उठली. मानेवरचं जोखड कधीच दूर झालं होतं. आरशातल्या मैत्रीणीला तिनं मनापासून धन्यवाद दिले.

विशाल आपल्या बुद्धीच्या जोरावर अमेरिकेला गेला खरा पण त्यासाठी सुरुवातीला लागणारा पैसा अण्णांनी उभा केला. प्रसंगी आपल्या प्रॉव्हीडंट फंडमधून त्यांनी त्याला अर्थ सहाय्य केले. कधी आईने आपला चंद्रहार गहाण ठेवून विशालसाठी पैसा उभा केला. विशाल ग्रीन कार्डधारक झाला. अमेरिकन मुलीशी त्याने लग्न केले. संसार सुखात चालला. त्याने खूप नाव, पैसा, लौकिक कमावला. एक दोनदा आई अण्णांची अमेरिका वारीही झाली. विशालला अमेरिकेला जाऊन अठ्ठावीस वर्ष झाली.

तो भारतात येणार नाही हे तर आई अण्णांना माहीतच होते. पण आई जेव्हा न्युमोनियाने आजारी पडली तेव्हा त्याला ओढ वाटेल आणि आईला भेटायला तो येईल असे तिला नक्की वाटत होते. ती त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसली होती. तिचा श्वास त्याला भेटण्यासाठीच फक्त चालू होता. एक दिवस निरांजनातली वात विझून गेली. शेवटी त्याला भेटण्याची तिची आस तशीच राहिली. तो आला नाही. कारण तो येऊ शकला नाही. त्याची कामाची जबाबदारी मुलाच्या कर्तव्यापेक्षा श्रेष्ठ ठरली. आणि वयाच्या चढत्या भाजणीने तिचे आजारपण वाढत गेले आणि त्यातच तिचा अंत झाला. ती गेल्यावर अण्णांना भेटायला अगदी चार दिवसांसाठी तो भारतात येऊन गेला.

आई जाऊन दीड वर्ष झालं. एक दिवस अण्णांना हलकासा ताप आला. विशालचा चुलत भाऊ आणि वहिनी अण्णांची काळजी घेत होती. त्याना खोकला

झाला आणि तो वाढत गेला. सुरुवातीला घरगुती औषधं झाली. नंतर आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, ॲलोपॅथिक सगळेच प्रकार झाले, त्याना पाणीसुद्धा गिळता येईना तेव्हा बायोप्सी केली. रिपोर्ट पॉझिटिव्ह आला. पण अर्थातच त्यांच्या पर्यंत तो पोचवला नाही. पोटात अन्नच जात नसल्याने त्यांची प्रकृती खालावत गेली. विशालचा भाऊ त्याची वाट पहात होता. आईच्या वेळची चूक तो पुन्हा करणार नाही असे त्याला वाटत होते. पण या वेळीही त्याची बापाची जबाबदारी मुलाच्या कर्तव्याच्या आड आली. त्याच्या मुलाचं ग्रॅज्युएशन होतं, ते तो चुकवू शकत नव्हता. तो अण्णांना भेटायला आला नाही. शेवटी व्हायचं तेच झालं, शेवट अटळ होता. अण्णांनी राम म्हटला.

चुलत भावाने फोन करून विशालला कळवलं. मॉर्गमध्ये ठेवायचं कि क्रियाकर्म करायचं? यावर विशालच उत्तर होतं, मला सध्या यायला सवड नाही. तेव्हा बाबांच्या पार्थिवावर तूच अंत्यसंस्कार कर. त्यांच्या हॉस्पिटलचा आणि औषधांचा खर्च तुला पाठवीनच. तसंही आता बाबा तर या जगात नाहीतच. मी कुणाला भेटायला येणार? त्यांची सगळी कागदपत्र एकत्र करून ठेव. वारसदार म्हणून सगळीकडे माझं नाव असणार तेव्हा मी पुढच्या वेळी जेव्हा भारतात येईन तेव्हा सगळयांवर सह्या करीन.

" रोहित, अनया कशी आहे? तिला काही त्रास होत नाही ना? आता जरा जपूनच काम कर म्हणावं. तिची काळजी घ्यायला तिकडे कोणीच नाही. तू तिला मदत करतोयस ना?" काळजीच्या सुरात रोहितची आई अनयाची चौकशी करत होती. अनया म्हणजे अर्थातच त्यांची सून. अनया बत्तीस वर्षांची होती. तिचा दोन वेळा गर्भपात झाला होता. त्यामुळे परदेशात असलेल्या गरोदर सुनेची काळजी त्याना वाटणे साहजिकच होते. सासू या नात्याने रोहितच्या लग्नानंतर त्यांनी तिचे खुप कौतुक केले होते. अनया अतिशय गुणी मुलगी होती. बालमानसशास्त्रात डॉक्टरेट झालेली होती. अत्यंत लाघवी होती. सगळयाना सांभाळून घेणारी होती. कुणाच्या मनाला दुखावणारी नव्हती.

लग्नानंतर सहा महिन्यांनी ती रोहीतकडे अमेरिकेला गेली. अनयान घराला अगदी आपलसं केलं होतं. ती गेली खरी. पण मनात एक सल घेऊनच. रोहितच्या आजीला ती घरी आणू शकली नव्हती. नात्यातली दरी सांधली गेली नव्हती.

दोन वर्षांनी नातवंडाच्या आगमनाची गोड वार्ता मिळाली होती. अनयाच बाळंतपण जवळ आलं तसं रोहितन आईबाबांना तिकडे बोलावलं. त्याच्या आईने जय्यत तयारी केली. अनयाला आवडणाऱ्या आणि बाळंतिणीला हव्या असलेल्या सगळया वस्तू, पदार्थ करून बरोबर घेतले. बऱ्याच वर्षांनी घरात बाळाचं

आगमन होणार होतं, घराला घरपण येणार होतं. रोहितच्या आईचा उत्साह ओसंडून वाहात होता. अनयाला बाळंतीण म्हणून कसं वागाव याबद्दल बऱ्याच गोष्टी त्याना सांगायच्या होत्या.

विमानतळावर अनया त्याना घ्यायला आली होती. रोहितने आपले घर आईबाबांना फिरून दाखवले. गेस्ट रुमपाशी ते आले. दार बंद होते. रोहितने दारावर टकटक केले, दार उघडले एका ऐंशी वर्षांच्या वृद्ध आजीबाईनी. आजीच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर प्रसन्नता होती. रोहितची आई क्षणभर अवाक होऊन पहातच राहिली. ती रोहितची आजी होती. “ ही माझी आजी आणि ही माझी आई. ” मिस्कीलपणे हसत रोहितने दोघींची एकमेकींशी ओळख करून दिली.

स्वत:ची स्पेस हवी असणाऱ्या सुनेने सासूला वृद्धाश्रमात ठेवले होते. आर्थिक परिस्थितीने स्वतंत्र असलेली रोहितची आजी आणि स्वत:चा अहं कुरवाळणारी आई यांच्या द्वंद्वात सासू सुनेत अंतर पडल होतं. दोघींपैकी कुणीतरी एक पाउल पुढे आणि एक पाउल मागे येणं आवश्यक होतं. दोघीही आपल्या जागी ठाम होत्या. अनयान मात्र सासूला आणि आजेसासुला प्रेमान जिंकून घेतलं होतं. कधी त्यांच्या हो ला हो म्हणून तर कधी थोडस अधिकारवाणीने सांगून आपुलकी आणि जवळीक दोघींशीही वाढवली होती. आणि आता त्या दोघींचंही अनयावाचून पान हलत नव्हतं.

“आम्हा दोघांसाठी तुम्ही दोघीही जवळ असण महत्वाच आहे. काहीही म्हटलं तरी आपल्या नात्यांचे बंध चिवट आहेत. एकमेकांशी असणारे लागेबांधे असे सहज सहजी तोडता येत नाहीत. आणि ते तुटतही नाहीत. कधीतरी आपलं स्वत्व जरास बाजूला ठेवाव लागतं इतकंच. पैसे देऊनही नातं विकत मिळत नाही मग हे बंध तोडायचे कशासाठी. ” काल लग्न होऊन आलेल्या पोरीने, तिच्यापेक्षा कितीतरी पावसाळे अधिक पाहिलेल्या त्या दोघीना शिकवले होते, आपल्या कृतीने.

राघव शून्यात नजर लावून बसला होता. बाबांना जाऊन आज आठ दिवस झाले होते. घरात दिवसाला येणारे पाहुणे जास्त नव्हते. खरतर बाबांच्या इतका प्रेमळ माणूस राघवने आयुष्यात पाहिला नव्हता. आईपेक्षाही थोडसं जास्तच प्रेम होतं त्यांचं राघववर. आईच्या माघारी तेच राघवचे आई आणि वडील झाले होते. पण बाबांची मानसिकताच कळत नव्हती. स्वत:जवळ बऱ्यापैकी पुंजी असतानाही ते इतक्या चेंगटपणे का रहात होते ते कळत नव्हतं. त्यांच्या आजारपणाचा फारसा खर्चही ते करायला तयार नव्हते. त्यामुळे बाबांच्या वागण्याबद्दल त्याला कोडंच वाटायचं. छान छौकीची तर त्यांना कधीच आवड नव्हती. पण आईलाही त्यांनी फारशी हौस मौज करायला दिली नव्हती. तीही नवऱ्याने जशा परिस्थितीत ठेवले तशात खुश होती. कधीही त्यांच्याकडे पैसे मागितले की ते सहजासहजी द्यायला तयार नसत. बाहेर खाण्याला तर मज्जावच होता. बाकी प्रेम मात्र बाबा खूपच करत होते. राघवला जरासं काही लागलं की टचकन त्यांच्या डोळ्यात पाणी येत होते.

एकदा राघव लहान असताना त्याला छोटासा अपघात झाला होता. गाडीने मागून येऊन ठोकरले होते. त्यावेळी दवाखान्यात बाबा सतत त्याच्या उशापायथ्याशी बसून होते. त्याच्या सेवेला हजर होते. त्यावेळी तो काय म्हणेल ते त्याला मिळत होतं. राघवच्या त्यावेळी मनात आलं होतं, आपण असच कायम हॉस्पिटलमध्ये पडून राहिलो तर आपले लाड होतील. आपल्याला हव्या त्या वस्तू बाबा लगेच आणून देतील.

बाबांच्या जुन्या वस्तू काढताना त्यांच्या ट्रंकेत एक डायरी मिळाली. डायरीमद्धे पै न पैचा खर्च लिहिला होता. सगळा राघवसाठी केलेला. राघवच्या नावाने बँकेत काही रक्कम ठेवली होती. शिवाय आपल्या मिळकतीमधुन एक छोटासा प्लॉट त्यांनी त्याच्या नावे घेऊन ठेवला होता. जेणेकरून त्याच्या हयातीपर्यंत त्याला कुठल्याच गोष्टींची कमतरता पडू नये. त्याने एक उसासा सोडून ती डायरी पुन्हा ट्रंकेत ठेवण्यासाठी ट्रंक उघडली. बाबांचे काही जुने कपडे, आईचा शालू, घराचे कागद अस काहीबाही त्यामध्ये होतं. त्यात एक पत्रही त्याला मिळालं.

“आपल्या पोटच नसल तरी हे मूल म्हणजे देवाचा आशीर्वादच आहे अस म्हणायला हवं. नऊ महीने त्याचा भार उदरात न वाढवता आपल्याला हे मिळालं आहे. म्हणूनच त्याच्या आईला त्याला आपल्या पायरीवर ठेवाव अस वाटलं. कदाचित ह्या पोलिओ झालेल्या मुलासाठी खर्च करायची तिची ऐपत नसावी. पण आपल्या ओट्यात टाकलं आहे म्हणजे देवाने त्याला वाढवायची जबाबदारी आपल्यावर टाकली आहे. आपण फक्त एकच करायचं. तो पोरका आहे याची जाणीव त्याला करून द्यायची नाही. त्यासाठी आपल्या खर्चात काटकसर करावी लागली तरी चालेल. पण त्याच्यावर उपचार करायचे. ”

डोळयात भरलेल्या आसवांनी राघवला पुढे काही वाचता येईना. बाबांचा चांगुलपणा आणि प्रेम त्याला आठवायला लागले. आपल्यासाठी आईबाबांनी जो त्याग केला, कंजूषपणे केलेला संसार हे सगळे त्याला आठवले. त्याच्या हुंदक्यानी बाबांना मनोभावे श्रद्धांजली वाहिली. रक्ताचा नसलेला पण माणुसकीच्या नात्याचा बंध किती जबरदस्त चिवट असतो याचा प्रत्यय त्याला येत होता.

## परतफेड

आज बऱ्याच वर्षांनी निमा आणि अंजली भेटल्या. कॉलेज संपल्यापासून दोघींची जवळजवळ तीस वर्षं भेट नव्हती. दोघींच्या दिसण्यात वयानुरूप होणारा बदल सोडल्यास स्वभावात फारसा फरक झाला नव्हता. निमा पहिल्यासारखीच बडबडी, पटकन कुठल्याही निर्णयाप्रत येणारी, घाईघाईने आपलं मत प्रदर्शन करणारी. आपला राग, द्वेष, प्रेम व्यक्त करणारी, उतावीळ. तर अंजली शांत, पोक्त, पण तरीही हसून खेळून, समोरच्या व्यक्तीला आदराने वागवणारी. दोघींच्या स्वभावात, वागण्यात तसूभरही बदल झाला नव्हता. आज मॉलमध्ये अचानक भेटल्यावर निमाला खूप आनंद झाला.

"चल, आपण काहीतरी थंड घेऊ. तुला वेळ असेल तर थोडा वेळ गप्पा मारू. " निमाला घाई झाली होती, आपल्या विषयी सांगण्याची. आपलं लग्न कसं ठरलं इथपासून ते स्वत:चा नवरा कसा कर्तबगार आहे, संसार कसा मस्त, सुखी आहे. देशाविदेशात फिरत असतो. आपला बंगला आहे, मोठ्ठी गाडी आहे याच वर्णन करता करता तिची अगदी दमछाक झाली. अंजलीच राहणीमान तिला अगदी साधसच वाटलं. साधासा अंबाडा. साडी चांगली होती. पण गळयात म्हणावं तर निमा सारखं चार पदरी मंगळसूत्र नव्हतं. गळयाबरोबर असलेला मोत्याचा एक सर. त्यालाच एक वाटी. खड्यांची असेल बहुतेक. एकूणच तिची आर्थिक परिस्थिती बेताची असावी असा निमाचा कयास.

“ अग, तुझं काय? तू कशी आहेस? बाकी तू आहेस तशीच आहेस म्हणा! तुझा शांतपणा काही गेला नाही. संसारात खुश आहेस ना? काही लागलं तर मी आहे हं मदतीला आता. आपण एकाच गावात राहतोय त्यामुळे आपण वरचेवर भेटू शकू. इतक्या वर्षात तुझ्या मदतीची परतफेड काही करता आली नाही. तू मला अभ्यासात किती मदत करायचीस. ”

“आम्ही इथे येऊन अगदी पंधरा दिवसच झालेत. पण आता आपण नक्की भेटत जाऊ. अगं आणि परतफेड कसली म्हणतेस? ते तुझ्या माझ्या मैत्रीतल प्रेम होतं. ” अंजली हसत हसत म्हणाली.

“ अंजू, तू वाईट वाटून घेऊ नको. पण जर तुझ्या मिस्टरांना चांगली नोकरी हवी असेल तर माझ्या नवर्याच्या खूप ठिकाणी ओळखी आहेत. त्यांचं काम होऊन जाईल. ” दोघींनी पुन्हा भेटण्याचं आश्वासन एकमेकीना देऊन निरोप घेतला.

आज नवीन प्रोजेक्टसाठी निमाच्या नवऱ्याच प्रेझेन्टेशन होतं. त्याने खूप अभ्यास करून ते प्रेझेन्टेशन बनवलं होतं. संध्याकाळी तो घरी आल्यावर निमा त्याबाबतीत ऐकायला अगदी उत्सुक होती. त्याच्या बॉसनी, श्रीवास्तव साहेबांनी त्याच्या प्रोजेक्टच कौतुक केलं होतं.

“बरं झालं बाई, तुमच्या कामाचं सार्थक झालं. नाहीतर नवीन बॉस खडूस असता तर कामाची किंमत शून्यच केली असती. ”

“ हे बघ आमचे फोटो. ” त्याने मोबाइलवर काढलेले फोटो निमाला दाखवले.

“ तुमच्या फोटोत माझी मैत्रीण अंजू कशी काय?”

“ म्हणजे त्या तुझी मैत्रीण आहेत? त्या श्रीवास्तव साहेबांच्या मिसेस आहेत. त्यांनी आमची सगळया स्टाफ बरोबर त्यांची ओळख करून दिली. त्यांनीच तर आमच्या प्रोजेक्टचं डिझाईन केलंय. त्या आर्कीटेक्ट आहेत आमच्या. ”

आता आ वासण्याची पाळी निमाची होती.

# पिंजरा

बेल वाजली. सीताबाई लगबगीने दार उघडायला निघाल्या ते मनाशी म्हणतच, आज कोण अभागी जीव आहे बिचारा कुणास ठाऊक. गोधडी, अंगडी टोपडी कपाटातून बाहेर काढायला पाहिजेत. विचारातच त्यांनी अनाथाश्रमाचे दार उघडले. समोर सुमन उभी होती. तिचे दिवस भरलेले दिसत होते. ही तिची तिसरी खेप. अरे देवा हिला कसं समजवावं. असं कुठवर चालणार हे! तिला आत घेतलं. सुमनलाही अनाथाश्रमात येणं आणि रहाणं अंगवळणी पडलं होतं. दोन जीवांची, तिशीची सुमन अगदी रसरशीत दिसत होती. पण आठ दिवस तरी घेईल कि नाही कुणास ठाऊक. सीताबाईनी मनाशीच अंदाज बांधला.

खरोखरच त्यांच्या अंदाजाप्रमाणे सुमन आलेल्या सहाव्या दिवशीच बाळंत झाली. मुलगा झाला. मुलाचं सगळ व्यवस्थित करायची ती. स्वत:च बाळाला अंघोळ घालणं वगैरे करायची. पण घरून येताना बाळासाठी एवढासा सुद्धा कपडा आणायची नाही. कि स्वत:साठी दोन जास्तीच्या साड्या नसायच्या. असायच्या त्याही साध्याशाच, सुती. बाहेरचा वारा न लागलेली ती छानछोकी काय करणार बिचारी! कर्मठ घरातली होती ना ती! आश्चर्य एवढंच वाटायचं कि घरची मंडळी बिनबोभाटपणे सुमनच बाळंतपण करवून घ्यायची, पण ती आश्रमात असताना एका अक्षरानेही तिची चौकशी करायची नाहीत. ना बाळाला बघायला यायची ना त्याची चौकशी करायची. तीन महिने झाले कि सुमन घरी जायची.

यावेळीही बाळाला सोडून ती चालली. तिने तसं सांगितलं नव्हतं पण एकूण तिचा रावरंग तसाच वाटत होता. आश्रमाच्या संचालिकांच्या स्वभावाचा गैरफायदा घेताहेत हे लोक असे सीताबाईना वाटले. आता मात्र त्याना राहावलं नाही.

“काय चालवलं आहेस सुमन तू? बाळंत झालीस कि मुलाला सोडून निघून जातेस. ”

“माई काय करणार बाळाला घेऊन जाऊन! कामं कशी होणार? आणि नाही गेले घरी तर सगळ्यांचं कसं होईल?”

“जर तुझ्याशिवाय होत नाही, तर बाळाला का ठेऊन घेत नाहीत?”

“प्रत्येकजण म्हणतो मूल माझं नाही. मीही सांगू शकत नाही मूल कुणाचं ते. मग कोण त्याच्या देखभालीची जबाबदारी उचलणार माई?”

आता झीट येऊन पडायची पाळी सीताबाईंची होती.

“ मग तू इथेच राहा ना. नाहीतरी तुझं त्या घरात कोण आहे? कशाला जातेस तू तिकडे? तुझा नवरा गेल्यावर तुला तिथे काय वागणूक मिळते गं? चार घास अन्न मिळावं म्हणून त्याच्या भावांकडे आश्रितासारखी राहतेस? इथे राहून तुझ्या मुलाना तू सांभाळू शकशील. ”

“ नाही नाही. मला गेलं पाहिजे माई, आता बघा, माझ्याशिवाय थोरल्या वहिनींची काम अडतात, मधल्या वाहिनी तर पूर्णपणे माझ्यावरच अवलंबून असतात. धाकटीला तर माझाच आधार असतो. आबासाहेब, दादासाहेब, भाई, आण्णा यांचही अडलं नडलं मलाच बघायला लगत. घरात मी नसले कि किती गोंधळ उडतो. नाही, मला लवकर जायलाच पाहिजे. केव्हा एकदा बाळ होतंय आणि मी घरी जातेय असं होतं मला. ”

सुमन मुलाला ठेवून त्याना न सांगताच निघून गेली. सीताबाई विचार करायला लागल्या, एकदा का पंख छाटले असले कि पिंजरा उघडला तरी पक्षी बाहेर जात नाही. बाहेरच्या जगाच त्याला भय वाटतं. पिंजऱ्यातल आयुष्य सुरक्षित वाटतं. झापड बांधून जगायची सवय होते. आपलं भलबुरं कशात आहे याचा सारासार विचार खुंटतो. बिचारी सुमन आपलं सगळ आयुष्य बाकीच्यांसाठी खर्च करतेय. आपण पिंजऱ्यात अडकलोय याची तिला जाणीवही नाही.

निमिष रियालिटी शोच्या टीव्हीवरच्या गाण्याच्या स्पर्धेत पहिल्या फेरीत दुसरा आला, दुसऱ्या फेरीत पहिला आला, आई पपांच्या अपेक्षा उंचावल्या. त्यांचे हात गगनाला भिडले. पण तो तिसऱ्या फेरीत तिसरा आला. आणि अंतिम निर्णायक फेरीत तर तो नंबरात येउच शकला नाही. परीक्षक नेहमी स्पर्धकाना प्रोत्साहित करत होते. ही स्पर्धा म्हणजे आयुष्याचे अंतिम ध्येय नाही. अशा अनेक कसोट्या पार पाडायच्या आहेत. आपले प्रयत्न मात्र कमी पडता कामा नयेत. पण निमिष स्पर्धेत पराभूत झाला आणि त्याची आई स्टेजवरच त्याला पोटाशी धरून ढसढसा रडली. इथेच निमिषच्या मनाने कच खाल्ली. खरतरं आई आणि पपांच्या स्वनांची पूर्णता करताना त्याचा जीव मेटाकुटीला आला होता. त्याला गाण्यात पहिला नंबर नको होता. त्याला ना जिंकायचं होतं ना महाविजेता व्हायचं त्याच स्वप्न होतं. पण........ केवळ आईवडिलांची निराशा होऊ नये म्हणून, त्याना मनाने खचलेल पाहाण जीवघेणं होतं म्हणून त्याचं मन कासावीस होतं होतं. निव्वळ त्यांची बेचैनी त्याला मान खाली घालायला भाग पाडत होती. त्यांच्या अपेक्षांचा भंग त्यानं केला होता वयाच्या चौदाव्या वर्षी. आपण जगण्याला लायक नाही असं काहीसं निमिषच्या मनाने घेतलं, निराशेच्या गर्तेत हळूहळू तो जायला लागला. त्याचं अभ्यासातही लक्ष लागेना. टीव्हीवरच्या गाण्याची एक स्पर्धा त्याला आयुष्यातून उठवून गेली होती. नालायक ठरवून गेली होती.

खरतरं सुयशही त्याच्यासारखाच पराभूत झाला होता. पण त्याच्या चेहऱ्यावर दु;खाची छटा मात्र नव्हती. ग्रीन रुममध्ये आल्यावर सुयश निमिषजवळ

आला. त्याच्या खांद्यावर त्याने थोपटल्यासारखे केले. “अरे एवढं रडण्यासारखं काय झालंय? पुढच्या वेळी किंवा दुसऱ्या कुठल्याही स्पर्धेत नक्की तू जिंकशील बघ! थोडं खिलाडूपणाने घे. कुणीतरी जिंकणार आणि कुणीतरी हरणार हे नक्कीच. आणि आपण हरलो म्हणजे काही जगबुडी झाली नाही. एवढं मनाला लावून घेऊ नकोस. आपण आणखी प्रयत्न करावा म्हणून स्पर्धा असतात. ” निमिषच्या मनाचं समाधान झालं कि नाही हे त्याला कळल नाही.

आणि एक दिवस अचानक एका सिनेमाच्या गीतासाठी पार्श्वगायनासाठीचा पुरस्कार सुयशला मिळाला. टीव्हीवरची त्याची मुलाखत निमिष आणि त्याचे आई पपा आश्चर्याने पहात होते. केवळ आठ वर्षात सुयशने इतकी मोठी मजल कशी मारली? याचं रहस्य जाणून घ्यायला उत्सुक होते.

सुयशने, त्याच्या सारख्याच एका हरलेल्या मुलानं त्याला दाखवून दिल होतं, अपयशान तो खचून न जाता त्यानं जास्त जोरात प्रयत्न केले होते. सुयश, आजचा सेलिब्रिटी सांगत होता, “ लहान असताना मी कधी कधी स्पर्धांमध्ये भाग घेत होतो. पण माझ्या दृष्टीने स्पर्धा ही नंबर काढण्यासाठी कधीच नव्हती. ती फक्त माझ्यातल्या गुणांना आणखीन तावून सुलाखून, पारखून घेणारी म्हणूनच मी त्याकडे बघत होतो. माझ्यातल्या कलेनं माझ्यातल्याच कलेशी केलेली स्पर्धा होती ती. माझा संगीताचा रियाज कायम होता. मी कधी अभ्यासाचाही बाऊ केला नाही, कारण मला गाण्यात करियर करायचं होतं. आई बाबांनी मला जीवघेण्या स्पर्धेत उतरवलं नाही हे माझं भाग्य. स्पर्धेत मिळालेल्या बक्षिसाने मी कधी हुरळूनही गेलो

नाही आणि अपयश मिळाल्यावर खचूनही गेलो नाही. कधीकधी गाताना स्पर्धेत परीक्षकांनी दिलेल्या वेळेपेक्षा जास्त वेळ लागला. पण गाण्यातली एखादी हरकत, जागा घेता घेता असा काही आवाज लागायचा कि त्या स्वरांच्या स्पर्शाने अंगावर रोमांच उभे रहायचे. गातानाचा तो क्षण माझ्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असायचा. आणि त्याचा आस्वाद मी पुरेपूर घेत होतो. मला मिळालेला हा पुरस्कार हा माझा अंतिम टप्पा नाही. माझं गाण लोकांनी आवडीने ऐकाव हाच माझा ध्यास राहील, तेच माझं स्वप्न आहे. ”

निमिषला या क्षणी जाणवत होतं कि खरचं आपलं स्वप्न काय होतं याचा विचार आपण कधीच कसा केला नाही. निमिषचे आई पपा मात्र आपलं स्वप्न धुळीला का मिळालं याची कारण मीमांसा शोधून काढण्यात गर्क होते.

प्रियंवदा गेल्या वर्षीच या कॉलेजमध्ये मराठीची प्राध्यापिका म्हणून रुजू झाली होती. चाळीशीच्या प्रियंवदाचं मराठीवर प्रभुत्व होतं. तिचं बोलणं समोरच्याला गुंगवून टाकायचं. अल्पावधीतच ती कॉलेजच्या मुलांची आवडती प्राध्यापिका झाली. त्याला अक्षयसारख्या टारगट मुलाचाही अपवाद नव्हता. पहिल्या लेक्चरला त्याने त्रास देऊन पाहिलं. पण सगळ्या मुलांसमोर वर्गात न रागवता प्रियंवदाने त्याला क्लास संपल्यावर बोलावले आणि समजावले. वास्तविक बाकीचे प्राध्यापक वागत तसं सगळ्यांसमोर त्याला खडसवायला तिला काहीच हरकत नव्हती. पण चारचौघात त्याचा पाणउतारा करणं तिला बरोबर वाटल नाही. तिची ही एकच गोष्ट त्याला प्रचंड आवडून गेली. तिच्या समजावण्याने अक्षयला मीही सभ्य आहे ही भावना चेतवून गेली.

लास्ट बेन्चर असणारा, प्राध्यापकांच्या खोड्या काढणारा अक्षय प्रियंवदाच्या लेक्चरला मात्र नेमाने बसायला लागला. त्याला तिचं शिकवणं आवडायला लागलं. अक्षयनं निव्वळ प्रियंवदा मॅडम शिकवतात म्हणून एफ वाय कॉमर्सला मराठी घेतलं. बारावीला त्यांच्या शिकवण्याचा त्याच्यावर एवढा प्रभाव पडला कि त्यानं मराठीच निवडल. त्यांचं कविता शिकवणं तर केवळ लाजवाब होतं. कवी मग तो कोणीही असो, विंदा, ग्रेस, सुरेश भट असोत, शांता शेळके, इंदिरा संत किंवा पाडगावकर असोत, कवितेचा भावार्थ सांगताना त्यामागचा संदर्भ, कवितेचा न जाणवलेला पण तिच्यात दडलेला गर्भितार्थ, कवीची मनोभूमिका समजावून सांगताना ती कविता अक्षरश: जगल्यासारखं अक्षयला वाटायचं. कानात प्राण आणून त्यांचं लेक्चर तो ऐकायचा.

मनाच्या आणि शरीराच्या दोन्हीही सौंदर्याचा मिलाफ प्रियंवदा मॅडमच्या ठिकाणी झालाय असं त्याला वाटायचं. शिकवताना दर काही वेळाने कळलं ना? असं म्हणताना त्या मानेला नाजूक झटका देत. त्या हलक्याशा झटक्याने हलणारे त्यांच्या कानातले झुमके त्यांच्या केसांच्या कुरळया बटांशी अलगद खेळायचे. त्याक्षणी अक्षयला प्रश्न पडायचा आपल्या डोळयाना सौंदर्याचं सुख मिळतंय कि कानाना कवितेची मेजवानी? त्याच्या मनावर त्यांनी गारुड केलं होतं. सारखं त्याना पहात राहावं असं त्याला वाटायचं. त्यांचं ओठ मुडपून हसणं त्याला वेड लावायचं. मनाची घालमेल होत होती.

एक दिवस अक्षयन ठरवलं कि काही झालं तरी मॅमना भेटून आपलं मन मोकळ करायचं. पण कसं आणि कधी हा प्रश्न होता. त्यानं मॅमना चिठ्ठी लिहायचं ठरवलं. “मॅम, तुम्ही मला आवडता. काय करू मला कळत नाही” प्रियंवदाने चिठ्ठी वाचली आणि अक्षयला भेटायला बोलावलं. कुणाच्या बापालाही न घाबरणारा अक्षय, मॅमनी बोलवल्यावर मात्र मनातून सटपटला. त्याचे हातपाय कापायला लागले. आपल्याला चांगलं खडसावणार म्हणून घाबरतच तो टीचर्स रुमच्या दाराशी आला. चाहूल लागताच प्रियंवदाने त्याला आत बोलावलं. मंद स्मित करत त्याला बाजूच्या खुर्चीवर बसायला सांगितलं. आणि बोलायला सुरुवात केली.

“अक्षय, मी तुला आवडते यामध्ये काही गैर आहे हे आधी मनातून काढून टाक. निसर्गाचा नियमच आहे कि या वयात भिन्नलिंगी शरीराकर्षण वाटायला हवं. तसं नसेल तरच काहीतरी चुकतंय असं मी म्हणेन. या वयात असलेल्या शारीर आकर्षणा बरोबरच आपल्या मनातही काहीएक आयडियल, आदर्श व्यक्तिमत्व

आकार घेत असतं. कधी नकळत आपल्या मनात ते साकार होत असतं तर कधी आपण जाणीवपूर्वक ते पाहात असतो. तसं तुझ्या मनातही आपली जोडीदार, प्रिया माझ्यासारखी असावी अशी कल्पना नकळत आकार घेते आहे. तुझी मनातली कल्पना आणि शरीराचं तरुण असणं यामुळे माझ्याबद्दल तुला आकर्षण वाटतंय. पण हे खरं नाही. कारण वस्तुस्थिती खूपच वेगळी आहे. दुसरं असं कि, आपल्या व्यक्तिमत्वाला अनेक बाजू असतात. तसंच, तुझ्या एकूण व्यक्तीमत्वात हा भाग म्हणजे टिप ऑफ द आईसबर्ग म्हणावा असा आहे. तुझी करियर, भविष्य, कौटुंबिक परिस्थिती, तुझ्यात सुप्तावस्थेत असलेले नेतृत्व गुण, दुसऱ्याना मदत करण्याची वृत्ती या गोष्टी खूप महत्वाच्या आहेत. या सगळया गोष्टींवरून तुझं चरित्र ठरणार आहे. तेव्हा काही काळासाठी वाटणारं आकर्षण महत्वाचं कि तुझं व्यक्तिमत्व महत्वाचं हे तुला ठरवायला हवं. याच वयात आपल्या चरित्राची बांधणी होत असते. त्याचा पाया इथेच घातला जातो. आणि त्यावर पुढच्या आयुष्याचं भवितव्य ठरतं. जेव्हा तुझा तूच आपल्या मनाला हे समजावून सांगशील, वस्तुस्थितीचं आकलन तुला होईल तेव्हा तुझ्या मनातला हा गोंधळ नक्की दूर होईल. कुणाला तरी फोन करत असताना कधी लक्ष नसेल तर दुसराच एखादा नंबर चुकून दाबला जातो. आणि मग रॉंग नंबर लागतो. आपल्याला काही समजत नाही. अरेच्च्या असा कसा रॉंग नंबर लागला? मनात कुठलीही अपराधीपणाची भावना न ठेवता स्वच्छ मनाने आपल्या भावनेचं विश्लेषण कर. हे योग्य आहे का याचा सारासार विचार कर. तुला तुझा योग्य नंबर नक्कीच मिळेल. ”

अक्षयच्या मनातले विचारांचे मोहोळ प्रियंवदाने हलक्या हाताने सोडवले होते. विचारांच्या गर्तेत सापडलेला अक्षय हळूहळू भानावर येत होता.

“उद्या भेटूया रे राजहंस बारमध्ये. च्यायला, ती नाझनीन काय माल आहे बघुया तरी! मस्तानी झक मारली असं म्हणतात. ” साहिलने चार पाच पेग एव्हाना सहज रिचवले होते. रिकामा ग्लास पुन्हा भरण्यासाठी टेबलवर वाट बघत होता. तीन पाकीट सिगारेट जळून राख झाली होती.

“ चल ए आता बास. साले घरी वाट बघतात. लॅचनं कुलूप उघडल तरी म्हातारी विचारायला येतेच. उशीर झाला रे बॅळ्या म्हणत, वाढू का, जेवतोस का करत बसते. साला कटकट. अपनी खुद कि जिंदगी भी ठीक तरहसे गुजारने नाही देते यार!” तो डोळे तारवटून तावातावाने बोलत होता.

“ यवडा चकणा खाल्याव पोट गपगार व्हुइल नायत काय! हवा शिराय बी वाव नसतुय या ढेरीमधी. आन कसलं जेवान खान घ्यीवून बसत्यात कोन जान! लैच काळजी करत्यात. आमी काय कुक्कुल बाळं हैत का काय?” गौत्यानं आपल्या बोलण्याचा शेर टाकला.

गौतमला आपण साहिल आणि निखिलचे मित्र आहोत याचा खूप अभिमान. त्यानंच तर त्या दोघाना दारू कशी आणि कुठ प्यायची ते शिकवलं होतं.

बारमध्ये बारबालांचा नाच पहायला कसं जायचं याबाबतीत तो त्यांचा गुरु होता. कुठे कोण बारबाला चांगली आहे याची बित्तंबातमी गौतमला असायची. हां, पैशाचा पुरवठा मात्र त्याला मित्रांनी करायचा. हा जणू अलिखित नियमच होता. तसं ठरूनच गेलं होतं.

** ** **

रावसाहेब आणि सुशिलाबाइना साहिलची खूप काळजी वाटायची. सुखवस्तू कुटुंबातला एकुलता एक कुलदीपक होता तो त्यांचा. तळहातावरच्या फोडाप्रमाणे त्याला दोघांनी जपल होतं. तो म्हणेल ते त्याच्यासाठी ताबडतोब हजर व्हायचं. मुला सुनेच्या माघारी त्याला माया दिली होती. त्यांचं अकाली अपघातात जाण्याचं दु:ख दोघांनी या वृद्धापकाळात साहिलकडे बघूनच पचवलं होतं. साहीलला कुठल्याही गोष्टीची उणीव भासू नये म्हणून ते धडपडायचे. दोघांना एकच शल्य होतं, साहिल शिकण्यात अजिबात रस घेत नव्हता. मग नोकरी वगैरे तर दूरच राहीलं. आजकाल तो दोघाना उद्धटासारखी दुरुत्तर करायचा. वाटेल तसे पैसे मागायला लागला होता. आपल्या संस्कारात काय कमी पडलं याचा दोघंही विचार करायचे.

ताम्हणे आजोबा म्हणायचे ते काही खोटं नव्हतं , “ त्याला वळण लावायला तुम्ही एकच करायला पाहिजे होतं. तुम्ही त्याला परिस्थितीचे चटके बसू

दिले असते म्हणजे समजलं असत. आपोआपच मार्गी लागला असता. तुमचे लाड नडलेत. ”

** ** **

साहिल नेहमीसारखाच रात्री उशिरा घरी आला. घरात सामसूम. अर्थातच दोघंही झोपले असणार तरी आजी येणारच हा त्याला हुसका होता. पण तीही आज जेवतोस का बाळ म्हणून विचारायला आली नाही. त्यालाच चुकल्या सारख वाटलं. म्हणून अंदाज घेण्यासाठी तो आजी आजोबांच्या बेडरूमकडे गेला. दरवाजा उघडा होता. आतमध्ये दिवा जळत होता. ते दोघेही मात्र खोलीत नव्हते. तो आत गेला. टेबलावर फुलांचा मोठा बुके त्याच्याकडे बघून हसत होता. अरे हो उद्या आपला वाढदिवस. बुकेच्या खाली एक लिफाफा होता. त्याने तो उघडला.

वाढदिवसासाठी काही पैसे त्यांनी ठेवले होते. प्रेमापोटी आजी आजोबाना त्याला सुधारणे कठीण जात होते म्हणून एक वर्ष त्यांनी त्याच्यापासून लांब रहाण्याचा निर्णय घेतला होता.

आज माझा वाढदिवस! बाकी कुणाच्याही लक्षात नसला तरी माझ्या तरी लक्षात रहायला हवा ! पण छे! आज योगायोगाने मला आठवण झाली ती मला मॅंगो आईस्क्रीम खावेसे वाटले म्हणून. लहानपणी डॅडी मला आवडतं म्हणून वाढदिवसाला नेहमी मॅंगो आईस्क्रीम आणायचे. आज फक्त आईस्क्रीम घेण्यापुरतेच पैसे खिशात शिल्लक आहेत. असू दे आज जेवणाला सुट्टी. पत्र्याच्या भगदाडीतून बोळातली मुलांची मजा पहात खायला लागले.

मी पहिल्यापासून उंच आणि आडव्या बांध्याची. गोरी असले तरी माझे फीचर्स जरासे वेगळे, एखादी परदेशी मुलगी वाटावी इतपत वेगळे. वर्गात मैत्रीणीही मला फारशा मिसळून घेत नसत. हिडीस फिडीस करायच्या. कारण काही कळायचे नाही. मी त्याना त्यांच्यातली का वाटत नव्हते? माझ्या मानाने त्या अगदी छोट्या वाटायच्या. माझ्या खांद्याला लागणाऱ्या. रांगेत, वर्गात मी सगळयात पाठी. अभ्यासात मला काही गम्य नव्हतंच. खेळात थोडीफार होते. शाळा संपली. मला फारशा मैत्रिणी कुणी नव्हत्याच. कॉलेजची दोन वर्ष कशीबशी केली.

मम्मीला संसाराचे काही खास प्रेम नव्हते. स्वैपाक तर तिला मुळीच येत नव्हता. नेहमी बघावं तर पाव आणि अंडी. नाहीतर फार फार तर पाव आणि उसळ. वाढत्या वयात भूक लागायची. पण घरात काही खायला नसायचं. डॅडी

आपल्या कारखान्याच्या कामात मग्न असायचे. डॅडी कडून कधी पैसे घेऊन बाहेर काहीतरी खायची. भय्याही तसंच करायचा. मग मनात आलं नोकरी करून पैसे मिळवावे म्हणजे खायला मिळेल. पुस्तकाच्या दुकानात नोकरीला लागले. वाचायची आवड होती म्हणून. जे पैसे मिळायचे ते चैनीसाठी उडवायची. पैसे केव्हाच संपून जायचे.

जेनी मला तिथेच भेटली. मला समजून घेणारी. ताई, आई आणि मैत्रीण जेनीमधेच एकवटले आहे असं वाटायचं. तिच्यावर खूप प्रेम करायला लागले. तिच्याशिवाय जगणं अशक्य आहे असं वाटायचं. दोन दोन दिवस मी तिच्याच खोलीवर रहात होते. पण एक दिवस मला न सांगताच ती न्युझीलंडला निघून गेली. त्यावेळी मी अक्षरश: कोसळून पडले. मनगटाची नस कापायला बघितली पण प्रयत्न अयशस्वी झाला. मम्मी, डॅडी, भैय्या याना याविषयी फारशी काही कल्पनाच नव्हती.

या नैराश्यातून बाहेर पडायला मला राशी आणि निमा यांनी मदत केली. त्या माझ्या मदतीला धावून आल्या. जेनीच्या बाजूच्या खोलीत त्या राहायच्या. आम्ही तिघी मिळून रहायला लागलो. मम्मी इतकी बेपर्वा होती कि ती माझी काही चौकशीही करायची नाही. आराम करणं, टीव्ही बघणं आणि कधीतरी डॅडींबरोबर कारखान्यात जाणं एवढंच तिचं काम. दोन दिवस मुलगी घरी येत नाही, ती कुठे असते, काय करते याची तिने कधी विचारपूस केली नाही. राशी, निमा यांच्यात मी खूपच गुंतले. त्या दोघी खूप घनिष्ठ मैत्रिणी होत्या. त्यामुळे वेळ येताच त्या दोघींनी हलकेच मला बाजूला केले. मला न दुखवता.

समोर आयुष्य भकास वाटत होतं. करायला काहीच नव्हतं माझ्याकडे. कुणीतरी कल्पना सांगितली कि तू हॉटेलमध्ये वेट्रेसच काम कर. तेही केल. ते करता करता मसाजर म्हणून काम करायला लागले. कधी मसाज पार्लरमध्ये तर कधी हॉटेलमध्ये कस्टमर मिळायला लागले. टीप चांगली मिळायला लागली. तिथे फ्रेडरिकची ओळख झाली. नायजेरियातून आलेल्या फ्रेडला मी आवडले. फेसबुकवर आमचे एकत्र फोटो बघून डॅडी चवताळल्यासारखे झाले. त्यांनी मी काही विचार करायच्या आत फ्रेडशी माझं लग्न लावून टाकले. मी त्यावेळी लग्न करावं कि करू नये यावर विचारच करू शकले नाही. त्यांच्या हो ला हो करत गेले. फ्रेडला फारशी चांगली नोकरी नव्हती. त्याचाच खर्च भागत नव्हता. माझ्या मिळकतीतून घर चालायचं. त्याचे आणि माझे त्यावरून खटके उडायला लागले. पुन्हा मी एकटी झाले.

मसाजर म्हणून काम करत होते. तेव्हा माझी आमदानी चांगली होती. भैय्यानं त्याच्या आवडीच्या मुलीशी संसार थाटला होता आणि तो वेगळा रहात होता. त्याचं आणि डॅडींचं पटतच नव्हतं. डॅडीना दवाखान्यात ठेवलं. त्याचा खर्च खूपच झाला. त्यांच्या डोक्यावर खूप कर्ज आहे हे त्यावेळी कळल. कर्ज मागे ठेवून ते गेले. मम्मी काही करू शकत नव्हती. तिला हाय ब्लडप्रेशर मागे लागलं. त्यांच्या पाठोपाठ एक वर्षात मम्मीही गेली. माझी जमा पुंजी संपुष्टात आली. त्यानंतर मीच आजारी पडले आणि हाताशी होतं ते काम निघून गेलं. एका दुकानात सेल्स गर्ल म्हणून काम मिळालं. त्या पगारात काय होणार म्हणून सत्तर वर्षांच्या दिनेशभाई यांच्याबरोबर कंपॅनियन म्हणून रहायला लागले. गेल्या वर्षी ते वारले, त्यांच्या घरातल्यांनी मला घराबाहेर काढल. तुटपुंज्या पगारात काय होणार? या छोट्या

पत्र्याच्या खोलीत रहायला आले. आज खायला मिळालं तर उद्या मिळेल का नाही याची खात्री नसते.

आज वयाची पस्तीशी आली, मी कुठेही स्थिर नाही. खायला मिळायची भ्रांत अशी अवस्था आहे. आज आईस्क्रीमची आठवण झाली आणि निवांतपणे माझा जीवनपट डोळ्यासमोरून सरकून गेला. एका उच्चशिक्षित, पांढरपेशा घरातली सुबुद्ध मुलगी तिची अशी अवस्था कोणी केली? तिने स्वत:, आईवडिलांनी, परिस्थितीने? जसा वारा येईल तशी मी वाहात गेले. पतंगाचा मांजा माझ्या हातात होता पण तो तुटलेल्या पतंगासारखी माझी अवस्था झाली. खरच मी इतरांपेक्षा वेगळी आहे का?

# जवळचे........ दूरचे

पूर्वार्ध:

" अहो, तुम्ही ऑफिसमधून आलात की आपण आज सिनेमाला जाउया ना!"

" बघू, आज कदाचित माझ्या मित्राबरोबर बाहेर जायला लागेल. त्याचा जरा प्रॉब्लेम झालाय. त्याला त्यातून बाहेर पडायला मदत करायला हवी मला. तुला त्यातलं काही कळणार नाही. "

"मला ताजी फडफडीत मासळी खावीशी वाटतेय. समुद्राचा खारा वारा, तो वास मला श्वासात पुरेपूर भरून घ्यावासा वाटतोय. एव्हढे तरी डोहाळे पुरवा बाई माझे"

"अगं डोहाळे कसले घेऊन बसली आहेस, माझी बदली होणार आहे. ती रद्द करून घेण्याच्या तयारीत आहे मी. बॉसला खुश करायला सध्या तरी मला रजा काढता येणार नाही.

“बाबा माझ्या शाळेचं आज गॅदरिंग आहे, तुम्ही येणार ना? मी नाटकात भाग घेतलाय. ”

“नाही रे प्रविण, आज मला महत्वाची मिटिंग आहे सोसायटीची. तिकडे जायलाच पाहिजे. ती चुकवून चालणार नाही. ”

“अहो आज प्रतिमाचा वाढदिवस, तिला तिच्या आवडीचा ड्रेस घ्यायला जाउया का?”

“ तुम्हीच दोघीजणी जाऊन आणा ना. नाहीतरी प्रतिमाच्याच आवडीचा ड्रेस आणायचाय न! मला जमेलसं वाटत नाही. माझ्या एका मित्राचा वाढदिवस आहे. त्याने मोठी पार्टी ठेवली आहे आणि मुख्य म्हणजे त्याची सगळी व्यवस्था मलाच बघायला लागणार आहे. ”

“ हॅलो, अहो प्रविणला खूप ताप भरलाय. त्याला हॉस्पिटलमधे ॲडमिट करावं लागणार असं आपले फॅमिली डॉक्टर म्हणताहेत. लवकर या. तुमची कामं

आटपायची वाट बघत बसू नका. असाल तसे या. माझा जीव टांगणीला लागलाय अगदी. ”

“ मी येतोय. पण असं काय करतेस, डॉक्टर आपले अगदी घरोब्याचे आहेत. त्यामुळे एवढं घाबरून जायचं काही कारण नाही. शिवाय एकदा का त्याला हॉस्पिटलमधे ॲडमिट केलं कि आपली बरीचशी जबाबदारी कमी होते. एसटीने मला निघून यायचं म्हणजे सात तास तरी जाणारच ना. थोडा धीर धर. ”

“मला ट्रीपला सोडायला या ना,” “ नाही गं बाळा! आई येईल ना!” “निदान न्यायला तरी याल का?” “ रात्री काकींच्याकडे सोबतीला झोपायला जायचंय बाळा. त्या लवकर झोपतात ना. काका गेल्यापासून एकही दिवस मी त्यांच्याकडे जायचा माझा नेम चुकवला नाहीये. ”

“बाबा, ह्या सुट्टीत आपण केरळला जावूया का? सगळेजण, आमचे मित्र सुट्टीत कुठे ना कुठे जात असतात. आपण मात्र कुठेच जात नाही. ”

“ मुलानो तुम्हाला सुट्टी असते. पण मला कोण सुट्टी देणार रे? कामं चालूच रहातात. आणि सुट्टी काढली तर पुढे कामाचा आणखीन भार वाढतच जातो. ”

उत्तरार्ध :

“ बरेच दिवस मनात येतंय, आपण दोघं खूप वर्ष झाली सिनेमाला गेलो नाही. आज जावूया का ग?”

“ अहो आज माझी भिशी आहे, आणि मलाच लागलीय, त्यामुळे आज सिनेमा कॅन्सल. ”

“ प्रवीण, अरे कधीतरी वेळ काढून बोलत बस माझ्याशी. सारखा आपला मिटींग्ज, कॉन्फरन्स, टुरिंग. स्वत:ला कधीतरी वेळ दे रे. आपल्या कुटुंबासमवेत वेळ घालवलास तर कामाचा बराच ताण हलका होतो. मलाही हल्ली वेळ कसा घालवायचा हा मोठा प्रश्नच पडतो बघ! प्रतिमाची, नातवंडांची सारखी आठवण येतेय. पण ती तरी तिचा संसार सोडून, मुलांच्या शाळा सोडून कशी येणार नाही का?”

ज्या काकींच्या सोबतीला मी जात होतो, त्या गेल्यानंतर आपुलकीची भावना म्हणून त्यांनी सुतळीचा तोडाही माझ्यासाठी ठेवला नाही, ज्यांच्यासाठी माझ्या लेकीच्या खुशीला मी झिडकारल. प्रवीणच्या शाळेच्या कुठल्याही

कार्यक्रमांना मला जाता आलं नाही. दरवेळी काहीतरी कारण असायचं आणि कार्यक्रम चुकायचा. मुलांच्या प्रेमाचा, कौतुकाचा असा क्षण, पत्नीच्या आग्रहाचं आर्जव वेळोवेळी मी टाळत गेलो. ज्या मित्रांसाठी मी माझा वेळ दिला ते आता कुठे आहेत? आणि आता माझ्या हातात मात्र काहीच नाही. आहे फक्त वेळच वेळ. आता मला आप्तांची आठवण येतेय. जेव्हा मी जवळच्याना दूर लोटत होतो, दूरचे मला आपलेसे वाटत होते तेव्हा मी खरच जागा नव्हतो का?

## लेखिकेची ओळख :



नावः सौ. सविता कौस्तुभ नाबर. ई मेल : savitanabar@gmail.com फोन : 8149658022

पत्ताः 1752/ 302 नाबर संकुल, 5th क्रॉस, राजारामपुरी मेन रोड, कोल्हापूर ४१६००८

शिक्षणः M.Com.

इतरः Dip.in Music (vocal) –शिवाजी युनिवर्सिटी

Dip.in Music (Tabla) मुंबई युनिवर्सिटी. तबल्याचे शिक्षण कै. केशवराव धर्माधिकारी, पं. विभव नागेशकर, सध्या श्री. महेश देसाई यांच्याकडे सुरु आहे.

सांताक्रूझ इथल्या The Yoga Institute, Santacruz इथे योग प्रशिक्षकाचा कोर्स केला. योग प्रशिक्षक म्हणून अनेक ठिकाणी काम. आर्य विद्या मंदीर मुंबई, सेंट फ्रान्सिस मॅनेजमेंट institute, मुंबई इथे योग शिक्षक म्हणून काम. अनेकाना उपचारयुक्त योग शिकवला.

मुक्त पत्रकार म्हणून गेली २२ वर्षे कार्यरत. महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, सकाळ, लोकप्रभा, तरुण भारत, लोकमत, पुण्यनगरी, सा. विवेक यामध्ये अनेक विषयांवर लेखन, लोकमत, अंतर्नाद यासारख्या अनेक दिवाळी अंकांमध्ये लेखन, परिसंवाद.


खालील पुस्तके प्रकाशित------

१. वर्क १०१ –अनुवाद (ले. एलिझाबेथ फ्रीडमन)

२. कृतार्थ मी-- अॅड. वसंतराव नार्वेकर यांचे चरित्र

३. सवाल जबाब पत्रकाराशी –पत्रकार सुभाष धुमे यांच्यावरील मुलाखतीचे पुस्तक

४. सामर्थ्य आहे चळवळीचे- देवदासी निर्मुलन चळवळीचे अध्वर्यू प्रा. विठ्ठल बन्ने यांचे आत्मचरित्र शब्दांकित





५. माईंड पॉवर –प्रेरणादायी पुस्तक


६. स्वत:ला ओळखा—प्रेरणादायी पुस्तक

७. हाऊ टू बिकम सक्सेसफुल—प्रेरणादायी पुस्तक


८. ग्रॅब द ऑपॉर्च्युनिटी----प्रेरणादायी पुस्तक


९. सक्सेस पासवर्ड-----प्रेरणादायी पुस्तक














ग्रॅब द
अपॉर्च्युनिटी
सविता नावर


सविता नावर
हाऊ टू बिकम
सक्सेसफुल


सवाल-जवाब
पत्रकाराशी
सविता नावर


कृतार्थ मी!
श्री.वसंतराव नार्वेकर यांचे आत्मचरित्र
शब्दांकन
सविता नावर


सामर्थ्य आहे
चळवळीचे!
विठ्ठल बन्ने


वर्क 101
अनुवाद
सविता नावर

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी सिनेमा हा एकेकाळी भारतात हिंदी सिनेमाच्या तोडीस तोड किंवा काकणभर वरचढच होता. मध्यंतरी मराठी सिनेमाला उतरती कळा लागली. प्रेक्षक येईना. म्हणून थिएटर मिळेना. थिएटरच मिळत नाही म्हणून चांगले मराठी सिनेमा बनेनात. आणि चांगले सिनेमा नाहीत म्हणून प्रेक्षक मिळेनात. असे एक दुष्टचक्र सुरू झाले. मग आला झी मराठी सिनेमा. आणि त्याच्याच जोडीने छोट्या आकाराची मल्टीप्लेक्स आणि डिजिटल प्रक्षेपण. त्यामुळे पुन्हा एकदा मराठी सिनेमा जोमाने बहरू लागला.

काहीशी अशीच परिस्थिती मराठी साहित्याचीही होत आहे. एकेकाळी टॉपला असलेले मराठी साहित्य मधल्या काळात टिव्ही आणि सिनेमाच्या युगात मागे पडले. पण आता मोबाईल आणि इंटरनेट यांच्यामुळे मराठी वाचकवर्ग फ़ार मोठ्या प्रमाणावर वाढतो आहे. आणि त्याच जोमाने त्यंच्यासाठी लिहिणारा दर्जेदार लेखक वर्गही निर्माण होऊ लागला आहे. मराठी साहित्याच्या भविष्याबद्दल आम्ही अत्यंत आशावादी आहोत.

आपली साथ मात्र पाहिजे. आपल्या ओळखीच्या जास्तीत जास्त लोकांना ई साहित्य बद्दल सांगा. त्यांचे ई मेल पत्ते व whatsapp नंबर कळवा. त्यांना ई साहित्यचं मोबाईल app download करायला सुचवा. आग्रह करा. ई साहित्यचे

मार्केटिंग करा. एकदम फ्रंट फुटवर येऊन खेळू. जबरदस्त मार्केटिंग करू. लाखांचे कोटी करू आणि मराठी साहित्य पुन्हा नंबर वन ला आणू.

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahitya.com

esahity@gmail.com

आता ई साहित्य चे APP उपलब्ध आहे. ई साहित्यचं App आपण खालील लिंकवरून आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करा आणि भरमसाट पुस्तकं फ्री वाचा.

https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

ई साहित्य प्रतिष्ठानची ई बुक्स Whatsapp broadcast service सुरू झाली आहे. पूर्णपणे फुक्कट पुस्तकं आता आपल्या मोबाईलवर थेट . कृपया नांव नोंदणीसाठी 7710980841 हा नंबर आपल्या मोबाईलवर सेव्ह करा आणि नंतर या नंबरवर वॉट्सऍप करून आपले नांव व शहराचे नांव कळवा. आपल्याला नियमितपणे एक नवीन मराठी ई पुस्तक Whats app द्वारे पाठवले जाईल. आपण ते पुस्तक आपल्या मित्रांना Whatsapp करा आणि भाव खा.

आपल्या ओळखीच्या किमान दहा लोकांचे मेल आय डी आम्हाला कळवा. त्यांना आम्ही विनामूल्य पुस्तके पाठवू. व आपल्याला VIP सभासद बनवले जाईल.